



# पार्श्वभूमी


रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818



बीड वर्ष ३६ वे अंक ९३ वा फोन २३०१०१ दिनांक २ मार्च २०२६ सोमवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.


# युद्ध भडकले ; पेट्रोल,डिझेलच्या किंमती वाढणार

**बीड दि.१ (प्रतिनिधी):– इस्त्रायल, अमेरिका विरुद्ध इराण यांच्यात सुरु असलेल्या घनघोर युद्धामुळे याचा परिणाम म्हणून भारतामध्ये देखील पेट्रोल, डिझेल, सोने,चांदी आणि त्याच्या संबंधीत वस्तुंच्या किंमती वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ज्या भागात युद्ध चालू आहे त्यात भागातूनच भारताने क्रूड ऑईल (कच्चे तेल) चा पुरवठा मोठ्या प्रमाणात होतो. सध्या युद्धामुळे या सर्व बाबी ठप्प असून याचा परिणाम भारताच्या पेट्रोलियम व्यापारावर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे जोपर्यंत युद्ध शांत होत नाही तोपर्यंत पेट्रोल,डिझेलच्या किंमती वाढतील असा अंदाज तज्ञांनी व्यक्त केला आहे.**



इस्त्राईल आणि ईराण यांच्यातील युद्ध आता टोकाला जाऊन पोहोचले आहे. इस्त्राईल व अमेरिकेने शनिवारी ईराणवर खेलेल्या हल्ल्यात त्यांचे राष्ट्रप्रमुख आणि सर्वोच्च नेते हयातुल्ला खामेनी यांच्यासहीत लष्कर प्रमुख व वरीष्ठ ४० अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. यामुळे हे युद्ध आणखी वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आजुबाजुच्या छोट्या छोट्या देशांवरही हल्ले होत आहेत. इराणने देखील इस्त्राईलच्या तेलअवीवर हल्ला केला. दुबईच्या विमानतळावरही हल्ले झाले आहेत त्यामुळे या भागातील देशांनी हवाई सेवा बंद केली आहे. तसेच या दोन देशातील युद्धाचा परिणाम म्हणून भारत आणि त्याच्या जवळच्या देशातील व्यापारावर त्याचा परिणाम होणार आहे. ईराणमधून भारत व इतर देशांकडे २०%पेक्षा जास्त तेलाची आयात केली जाते. अमेरिका आणि इस्त्राईलने ईराणच्या समुद्रांमधील तेल जहाजांना टार्गेट केले आहे, ज्याचा परिणाम म्हणून पेट्रोल,डिझेलची वाहतुक तूर्त तरी थांबविण्यात आली आहे. पान २ वर



## सोने,चांदीही महागणार

**इस्त्राईल,अमेरिका विरुद्ध ईराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर सोन्या-चांदीच्या किंमतीतही मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. रविवारी सोने ३ हजार रुपयांनी वाढले आहे. चांदीच्या किंमतीही मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. तीन महिन्यापासून सोने आणि चांदीच्या किंमती सतत वाढत आहेत. सोन्यापेक्षा चांदीच्या किंमतीमध्ये मोठ्या पटीत वाढ होत आहे. यामुळे ऐन लग्नसराईच्या काळातही सोने आणि चांदीच्या किंमती तेजीत राहणार असल्याचे तज्ञांचे म्हणने आहे.**

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची केली पाहणी



बीड दि.१ (प्रतिनिधी):- बीड शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तात्काळ दखल घेत स्वतः रस्त्यावर उतरून कॅमेऱ्यांची पाहणी केली. त्यांच्या या कार्यतत्परतेची शहरात चर्चा होत आहे.

मागील आठवड्यात बीड शहरातील अनेक सीसीटीव्ही कॅमेरे रामभरोसे असल्याची बाब समोर आली होती. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षकांनी भर उन्हात चालत जाऊन बार्शी रोडवरील पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील कॅमेऱ्यांची तपासणी केली.

**पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी रस्त्यावर उतरून कॅमेरे पाहणी केल्याने नागरिकात समाधान**

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर हेही उपस्थित होते.

शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी, वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा बसावा, चोरांचा गुन्हेगारांचा तपास करताना मदत व्हावी म्हणून बीड शहरातील रस्त्यावर, चौकात सीसीटीव्ही यंत्रणा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे कॅमेरे कार्यरत असणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणेला तत्काळ दुरुस्तीचे आदेश देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. पोलीस अधीक्षक स्वतःरस्त्यावर पान २ वर

## दारू पिऊन वाहन चालवल्यास ड्रायव्हिंग लायसन रद्द

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसेवा):- मद्यपान करून वाहन चालवल्याचे दिसून आले तर संबंधिताचे ड्रायव्हिंग लायसन रद्द केले जाईल अशी घोषणा केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. ते



आयसीआयसीयद्वारा आयोजित रस्ते सुरक्षितता कार्यक्रमात बोलत होते.

देशातील अपघातांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करून गडकरी म्हणाले, एखादी व्यक्ती मद्यपान करून गाडी चालवत असल्याचे वारंवार दिसून आले तर संबंधित चालकाचे ड्रायव्हिंग लायसन कायमस्वरूपी रद्द केले जाईल. देशात दरवर्षी पाच लाखांहून अधिक रस्ते अपघात होतात आणि त्यात सरासरी १ लाख ८० हजार जणांचा अंत होतो. दखलपात्र बाब म्हणजे मृतांमध्ये १८ ते ४५ वयोगटातील लोकांची संख्या ७२ टक्के आहे. पान २ वर

## बालसुधारगृहातून ३ मुले पळाली ; अधीक्षकांचा निष्काळजीपणा

बीड दि.१ (प्रतिनिधी):- दिनांक १ मार्च रविवार रोजी चार वाजण्याच्या सुमारास बीड बालसुधारगृहातून तीन मुले फरार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.



विविध गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या अल्पवयीन मुलांना पोलिसांकडून ताब्यात घेऊन न्यायालयाच्या आदेशानुसार बीड येथील बालसुधारगृहात ठेवण्यात येते. मात्र प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप केला जात आहे. या संदर्भात अधीक्षक कांबळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला ; मात्र त्यांनी फोन उचलला नाही त्यामुळे प्रशासनाकडून अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार,संबंधित मुले बालसुधारगृहातून पळून गेल्याचे समोर आले आहे. ही बाब उघड होताच परिसरात आणि जिल्हाभरात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणामुळे बालसुधारगृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वीही बालसुधारगृहाबाबत विविध तक्रारी समोर आल्या होत्या. तरीही ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याची चर्चा आहे. या घटनेनंतर अधीक्षकांची सखोल चौकशी करावी व जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, फरार झालेल्या मुलांची शोध मोहीम सुरू केल्याची प्राथमिक माहिती आहे.पुढील तपास सुरू आहे.


## निबंधक कार्यालयात सरकारी कागदपत्रांची तोडफोड ; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

आष्टी दि.१ (प्रतिनिधी):- आष्टी येथील निबंधक कार्यालयात शासकीय कागदपत्रे फाडून नुकसान केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे कार्यालयीन कामकाजात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

फिर्यादी घनश्याम कृष्णा खेडसकर (वय ५४), सहाय्यक दुय्यम निबंधक, निबंध कार्यालय आष्टी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ते मागील तीन वर्षांपासून दुय्यम निबंधक म्हणून कार्यरत आहेत. दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२.२० वाजता दस्त क्रमांक ७६३/२०२६ ची नोंदणी प्रक्रिया सुरू असताना लिहून देणारे पंकज सतीश बोरा, रा. ए-४ पिनाक गार्डन, कोथरूड, जिल्हा पुणे व त्यांच्यासोबत एक अज्ञात इसम कार्यालयात आले.यावेळी किरकोळ कारणावरून कार्यालयात अचानक वाद निर्माण झाला. त्यानंतर सोबत आलेला अज्ञात इसम तेथून निघून गेला. दरम्यान, संतापाच्या भरात पंकज सतीश बोरा यांनी टेबलावर स्कॅनिंगसाठी ठेवलेले दस्त क्रमांक ७४९/२०२६ चे शासकीय नोंदणीकृत पान २ वर

## वर्षातलं पहिलं चंद्रग्रहण ३ मार्चला

### आकाशात 'ब्लडमून' चा देखावा



मुंबई दि.१ (प्रतिनिधी):- यंदाच्या वर्षातील पहिले चंद्रग्रहण मंगळवार, ३ मार्च २०२६ रोजी होणार असून महाराष्ट्रात चंद्र उगवत असतानाच ग्रहणाचा शेवटचा टप्पा पाहायला मिळणार आहे. खगोल अभ्यासक आणि पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे एक नैसर्गिक आणि सुरक्षित खगोलदृश्य असून ते साध्या डोळ्यांनी पाहण्यास कोणताही धोका नाही.

**दुपारी प्रारंभ, पण दिसणार संध्याकाळी**

या ग्रहणास दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी सुरुवात होईल. मात्र त्या वेळी चंद्र पूर्व क्षितिजाखाली असल्याने भारतातून ग्रहणाचा प्रारंभ दिसणार नाही. संध्याकाळी चंद्र उगवत असताना ग्रहणाचा शेवटचा भाग विविध शहरांतून काही मिनिटांसाठी पाहता येईल.

**चूडामणी योग आणि ब्लड मून**

यंदाचे चंद्रग्रहण चूडामणी योगात होत असल्याचे पंचांगकर्त्यांनी नमूद केले आहे. पृथ्वीच्या दाट सावलीत चंद्र गेल्यावर त्याचा रंग काळसर-लालसर पान २ वर

## नगरपरिषदेच्या अध्यक्षांनाही नगरसेवकपद मिळणार

### परवानगी देणारे विधेयक विधिमंडळात मंजूर

मुंबई दि.१ (प्रतिनिधी):- नगरपरिषद, नगरपंचायत आणि औद्योगिक वसाहतींच्या अध्यक्षपदी निवडून आलेल्या व्यक्तीला एकाच वेळी नगरसेवकपदाची परवानगी देणारे विधेयक विधिमंडळाने शुक्रवारी मंजूर केले.

विधेयकाच्या मजकुरानुसार, नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या नगरसेवकपदी निवडून येण्यास पात्र असलेली व्यक्ती अध्यक्षपदी निवडून येण्यासही पात्र आहे. म्हणून, एखादी व्यक्ती अध्यक्ष आणि नगरसेवकपदी एकाच वेळी निवडणूक लढवू शकते आणि दोन्ही पदांवर निवडून येऊ शकते. दोन्ही पदांवर निवडून आलेल्या व्यक्तीला दोन्ही पदांसाठी लोकांचा मताधिकार असतो, असे त्यात म्हटले आहे.अप्रत्यक्षपणे अध्यक्ष म्हणून निवडून आलेली व्यक्ती नगरसेवक म्हणूनही राहते आणि अध्यक्ष आणि नगरसेवक म्हणून एकाच वेळी काम करते. म्हणून, सरकारने हे योग्य मानले की थेट निवडून आलेला अध्यक्ष नगरसेवक म्हणूनही काम करू शकेल. म्हणूनच, सदर कायद्याच्या कलम ५१अ-१अ आणि पान २ वर

## आमदार साहेबांची SUV सुसाट नेकनूर-येळंब हायवे पूर्ण अंधारात

बीड दि.१ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यामध्ये तत्कालीन पालकमंत्री मा. पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महामार्गाचे जाळे वाढले त्यामुळे रस्ते देखील चौपदरी झाले. सर्व महामार्गावर टोलनाके सुरू होऊन संबंधित कंपनीने त्यांची वसुली सुरू केली आहे. परंतु पूर्ण टोल घेऊन सुविधा कोणतेही देत नसल्याचा गंभीर प्रकार माहिती अधिकार कार्यकर्ते ॲड.शार्दुल देशपांडे यांनी उघडकीस आणला आहे. अहमदपूर तळेगाव दाभाडे महामार्ग (554 D) जो नेकनूर येळंब मार्गे पुढे जातो त्याचा नेकनूर आणि येळंब पॅचमध्ये गावातील जे हायमास्ट आणि स्ट्रीट लॅम्प बसविण्यात आले आहेत ते सर्व बंद अवस्थेत आहेत. यामुळे दोन गावांच्या रस्त्यांवर पूर्णपणे अंधार पसरला असून गंभीर अपघात होऊन पान २ वर

### NHAIकडे तक्रार दाखल



**सदरील प्रकार अत्यंत गंभीर असून त्याने जीविकास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे अतितात्काळ स्वरूपात NHAI कडे लेखी स्वरुपात तक्रार दाखल करण्यात आली असून त्याचा नियमित पाठपुरावा सुरू आहे.**
**ॲड.शार्दुल देशपांडे -९९६०४२०३८८**

## राज्यभरातील आयव्हीएफ सोनोग्राफी केंद्रांची तपासणी होणार

### बदलापूर येथे रूपाली चाकणकर यांची माहिती



मुंबई दि.१ (प्रतिनिधी):- स्त्री बीज विक्रीचा विषय केवळ बदलापुरपुरता मर्यादित नसून त्याची पाळेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेली आहेत. ही पाळेमुळे खोदून काढण्यासाठी राज्यभरातील बेकायदेशीर आयव्हीएफ व सोनोग्राफी केंद्रांवर धाडसत्र सुरू करणार असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिली.अवैधरित्या स्त्री बीज विक्रीचे प्रकरण बदलापुरात उघडकीस आल्यानंतर राज्यात खळबळ उडाली. गरजू महिलांना पैशांचे आमीष दाखवून त्यांच्या शरीरात स्त्रीबीज विकसित करून ते काढून पान २ वर


**हॉल किरायाने देणे आहे**
ऑफिसर कॉलनी, नगर रोड, बीड येथे प्रशस्त हॉल गोडाऊन अथवा ऑफिससाठी किरायाने देणे आहे.
मुख्य रस्त्यालगत प्रशस्त जागा, सोयीस्कर पार्किंग
इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
- संपर्क -
9049080808


## साय.दै. सिटीझन कार्यालयातील तोडफोड प्रकरणी १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

### आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी

बीड दि.१ (प्रतिनिधी):- येथील सायं.दै.सिटीझनच्या कार्यालयात १० ते १५ जणांच्या टोळक्याने घुसून तोडफोड केल्याची घटना शनिवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली होती. यावेळी टोळक्याने दरवाज्याच्या काचा व संगणकांची तोडफोड करून १५ ते २० हजार रूपये बळजबरीने काढून घेत पलायन केले. घटनेची माहिती कळताच शहर ठाण्याचे पो.नि.शितलकुमार बल्लाळ, सपोनि राठोड व त्यांच्या सहकार्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सदरील घटनेचा सर्व स्तरातून निषेध व्यक्त होत असुन याठिकाणी सिटीझनचे संपादक शेख मुजीब यांच्या फिर्यादीवरून अहेमद खान लियाकत खान, अयान इरशाद शेख, शेख बिलाल शेख रज्जाक व इतर १० ते १२ जणांविरूध्द बीएनएस कलम ३११, ३१० (२), ३२४(५), ३५२, ३५१ (३), मपोअ १९५१ चे कलम १३५ प्रमाणे बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात सर्व आरोपींना तात्काळ अटक करा अशी मागणी होऊ लागली आहे.बीड शहरातील बशीरगंज येथील सायं.दै.सिटीझनच्या कार्यालयात घुसून १० ते १५ जणांच्या टोळक्याने तोडफोड केली. या तोडफोडीत संगणक, प्रिंटर, पान २ वर

## भारताचा वर्ल्ड कप सेमी फायनलमध्ये प्रवेश

मुंबई दि.१ (प्रतिनिधी):- वर्ल्ड कप २०२६ च्या सेमी फायनलमध्ये भारताने वेस्ट इंडिजचा पराभव करत प्रवेश मिळवला आहे. या सामन्याच वेस्ट इंडिज संघाने प्रथम फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये १९५-४ धावा केल्या होत्या. भारतीय संघाने शेवटच्या ओव्हरमध्ये १९.२ चेंडूत आव्हान पूर्ण करत विजय मिळवला. सलामीवीर संजू सॅमसन याने ५० चेंडूत नाबाद धावांची खेळी करत महत्त्वाची भूमिका साकारली. पहिल्या ओव्हरपासून मैदानात असलेल्या संजूने शेवटपर्यंत भारताला सामन्यामध्ये पान २ वर

## बीड नगरपरिषदेत मीनाताई रणजितसिंह चौहान यांचा परखड आवाज

### शहरातील ज्वलंत प्रश्नांपासून महापुरुषांच्या सन्मानापर्यंत ठाम भूमिका



बीड दि.१ (प्रतिनिधी):- बीड नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका मीनाताई रणजितसिंह चौहान यांनी पालिका प्रशासनासमोर शहरातील प्रलंबित आणि ज्वलंत प्रश्नांचा ठामपणे पाढा वाचला. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांपासून पेठ बीडमधील विभागीय कार्यालयाच्या मागणीपर्यंत, आठवडी बाजारातील अतिक्रमणांपासून महापुरुषांच्या पुतळ्यांच्या सन्मानापर्यंत विविध विषयांवर त्यांनी परखड भूमिका मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.बीड नगर पालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी पार पडली. यावेळी नगरसेविका मीनाताई चव्हाण म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान तातडीने मंजूर करण्यात यावे, तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित आणि वेळेवर देऊन त्यांच्या सेवासंबंधी प्रलंबित प्रश्न त्वरित निकाली काढावेत, अशी ठाम मागणी त्यांनी केली. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाकडून पान २ वर

# राज्यभरातील सर्व कार्यालयांचे ३० दिवसांत पॉश ऑडिट

मुंबई दि.१ (प्रतिनिधी):- राज्यभरातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खासगी कार्यालयांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ म्हणजेच पॉश ऑडिट ची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी ३० दिवसांत विशेष ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.



राज्यातील प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती कार्यरत आहे का, तिची रचना व कामकाज योग्य प्रकारे सुरू आहे का, याची खात्री करण्यासाठी हे पॉश ऑडिट राबविण्यात येणार आहे. समिती आस्तत्वात नसल्यास तात्काळ स्थापना करावी, अन्यथा संबंधितांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार प्रत्येक शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळ, मंडळ, स्वायत्त संस्था तसेच खासगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती कार्यरत असणे आवश्यक आहे.

राज्य महिला आयोगाकडे येणा-या तक्रारी, विविध अहवाल आणि राज्यभरातील दौ-यांदरम्यान अनेक ठिकाणी गंभीर त्रुटी आढळून आल्याचे चाकणकर यांनी नमूद केले. काही कार्यालयांत समितीच स्थापन नाही, काही ठिकाणी ती केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात कार्यरत नाही. याशिवाय समिती सदस्यांना प्रशिक्षणाचा अभाव, वार्षिक अहवाल न सादर करणे आणि दर्शनी भागात माहिती फलक नसणे अशा बाबीही निदर्शनास आल्या आहेत.

कायद्याचे उल्लंघन झाल्यास होणार कारवाई

ऑडिटदरम्यान प्रत्येक कार्यालयाकडून सविस्तर आयसी ऑडिट रिपोर्ट तयार करण्यात येणार आहे. यामध्ये समितीची रचना, स्थापनेचा आदेश, प्राप्त व प्रलंबित तक्रारी, त्यावरील कार्यवाही, निकालांची अंमलबजावणी, वार्षिक अहवाल, जनजागृती उपक्रम आणि कार्यालयात लावलेले माहिती फलक यांचा समावेश असणार आहे. समिती अपूर्ण किंवा अस्तित्वात नसल्यास तात्काळ स्थापना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

३० दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश

सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी सदर परीक्षण पूर्ण करून ३० दिवसांच्या आत अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे सादर करावा, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या संदर्भात चाकणकर म्हणाल्या की, सर्व कार्यालयांमध्ये पॉश ऑडिट अनिवार्य करण्याची मागणी आयोगाने शासनाकडे केली होती. शासनाने २२ ऑगस्ट २०२५ रोजी यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेत शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातील मोठ्या प्रमाणावर बाहेर पडणा-या वर्किंग वुमन फोर्सला सुरक्षित, निर्भय आणि पोषक वातावरण मिळते आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बीड दि.१ (प्रतिनिधी):- होळी व धुलीवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरात पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवल्यामुळे नागरिकातून त्यांचे कौतुक होत आहे. या काळात समाज कंटकांकडून त्रास होत असल्यास पोलिसांनी बिनधास्त कारवाई करावी असे मत अनेक ज्येष्ठ नागरिकांनी बोलून दाखविले आहे.



रोटरी परिवार व सिंधी पंजाबी समाजव विविध सामाजिक संघटनेचे महारक्तदान शिबिराचे उदघाटन करताना अयोध्या येथिल संत साई सुरेंद्रदास ,डॉ जेसवानी ,डॉ आनंत मुळे व सर्व सामाजिक संघटनांचे अध्यक्ष या वेळी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान : लोकाभिमुख महसूल सेवेचा नवा अध्याय

# बीड तालुक्यात १६ मंडळे, ८८ सजे व २४० गावांत ७ मार्चपासून विविध सेवा गावातच मिळणार - तहसीलदार शेळके

बीड दि.१ (प्रतिनिधी):- राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान ( टप्पा क्र. १ ) राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ,पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम संपूर्ण राज्यात राबविला जात असून ७ मार्च २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत अभियानाची अंमलबजावणी करण्याचे आदेश शासन निर्णयाद्वारे देण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने सुरू असलेले हे अभियान केवळ प्रशासकीय कार्यक्रम नसून न्याय, तत्परता आणि पारदर्शकता या तत्त्वांचा प्रत्यक्ष अवलंब करणारा लोककल्याणकारी उपक्रम ठरत आहे.



कार्यालयात या या पारंपरिक पद्धतीऐवजी कार्यालय तुमच्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार शासनाने व्यक्त केला आहे .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे . मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद , निवासी उपजिल्हाधिकारी , उपजिल्हाधिकारी ( पुनर्वसन ) , उपजिल्हाधिकारी ( रोहयो ) , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , सह जिल्हा उपनिबंधक वर्ग १ , जिल्हा जलसंधारण अधिकारी , उपवनसंरक्षक प्रादेशिक , जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख आदी अधिकारी या समितीत सदस्य म्हणून कार्यरत आहे .

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर तसेच अपर विभागीय आयुक्त रीता मेत्रेवार यांनीही विभागीय स्तरावर मार्गदर्शन करून अभियान प्रभावी करण्याचे आवाहन केले आहे . शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिक , शेतकरी , विद्यार्थी आणि महिला यांच्या दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे .

बीड तालुक्यात अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार सुहास हजारे , प्रशांत जाधवर तसेच सर्व मंडळाधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांच्या समन्वयातून सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आला आहे . बीड तालुक्यात एकूण १६ महसूल मंडळे , ८८ सजे व २४० गावे आहेत . या सर्व पातळ्यांवर प्रलंबित प्रकरणांची यादी तयार करून शिबिरांमध्ये त्यांचा तातडीने निपटारा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे . शासन निर्णयानुसार १८ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत मंडळस्तरावर पूर्वतयारी करण्यात येणार असून त्यानंतर मार्च , एप्रिल आणि मे महिन्यात टप्प्याटप्प्याने शिबिरे आयोजित करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे . पूर्वतयारीदरम्यान भोगवटदार वर्ग २ जमिनी वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याची प्रलंबित कार्यवाही पूर्ण करणे , जिवंत ७/१२ मोहिम राबवून नोंदी अद्ययावत करणे , सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे प्रलंबित अर्ज मंजूर करून आदेश वाटप करणे , तुकडेबंदी कायद्यांतर्गत प्रलंबित व्यवहारांची गावनिहाय यादी तयार करून फेरफार करणे , विद्यार्थ्यांसाठी कॅम्प मोडवर दाखले वितरण , पाणंद रस्त्यांना प्रशासकीय मान्यता देणे तसेच सर्वांसाठी घरे अंतर्गत प्रलंबित पट्टे वितरण या बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे . उक्तीप्रमाणे कृती या म्हणीप्रमाणे छोट्या-छोट्या प्रलंबित नोंदी निकाली काढून महसूल अभिलेख शुद्ध आणि अद्ययावत करण्याचा प्रयत्न या अभियानातून होत आहे .

पान १ वरून

## युद्ध भडकले,पेट्रोल,डिझेल किंमती वाढणार

युद्ध सुरु असलेल्या देशांमधील हवाई यंत्रणा ही ठप्प झाली असून अनेक विमानतळ उध्वस्त करण्यात आले आहेत. दुबई, ईराण व आजुबाजुच्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय लोक अडकून पडले आहेत. त्यांना आणण्यासाठी भारताचे प्रयत्न सुरु आहेत. खामेनी यांच्या मृत्युनंतर ईराणमध्ये मोठ्या प्रमाणात संतापाची लाट पसरली असून मोठे हवाई हल्ले करण्याच्या प्रयत्नात ईराण लष्कर आहे. येत्या काही दिवसात इस्राईल व त्याच्या समर्थक देशांवर मोठ्या प्रमाणावर प्रतिहल्ले होताना दिसून येतील. ईराणच्या अधिकृत प्रसिध्दी माध्यमाने खामेनींचा मृत्यू झाल्याची माहिती दिली असून अमेरिकेचे राष्ट्रप्रमुख

डोनाल्ड ट्रम्प यांनीही ट्विट करुन याचीम माहिती दिली आहे.

## दारु पिऊन गाडी चालविल्यास लायसन

तसेच या अपघातांत १८ वर्षांखालील सुमारे १० हजार जणांचा मृत्यू होतो. सीटबेल्ट आणि हेल्मेटचा वापर न केल्यामुळे वार्षिक सुमारे ६८ हजार जणांना जीव गमवावा लागतो. अतिवेग, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलणे ही देखील अपघातांमागील मुख्य कारणे आहेत. हे रोखण्यासाठी प्रामुख्याने युवक आणि किशोरवयीन मुलांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या गरजेवर गडकरी यांनी भर दिला.

## पोलीस अधीक्षकांनी केली सीसी टीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी

उतरून परिस्थितीची पाहणी करत असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्यांच्या या कार्यशैलीमुळे पोलीस प्रशासन अधिक सजग झाल्याचे चित्र दिसत आहे.

## निबंधक कार्यालयात सरकारी कागदपत्रांची तोडफोड

कागदपत्र फाडून टाकले व ते कागदपत्र घेऊन कार्यालयातून निघून गेले, अशी तक्रार फिर्यादीने दिली आहे. सरकारी दस्तऐवजांची तोडफोड व नुकसान केल्याप्रकरणी आरोपी पंकज सतीश बोरा व त्याच्या सोबत असलेल्या अज्ञात इसमाविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार तागड हे करीत आहेत.

## बीड नगर परिषदेत मीनाताई चौहान यांचा परखड आवाज

होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

पेठ बीड परिसरात स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरू करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांची प्रशासकीय कामांसाठी होणारी गैरसोय थांबेल, असे त्यांनी स्पष्टपणे मांडले.

आठवडी बाजारातील वाढती अतिक्रमणे तातडीने हटवून वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी करत त्यांनी खाटीकखान्यातील टाकाऊ पदार्थ बाजारपेठ किंवा आसपासच्या परिसरात फेकले जात असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा टाकाऊ पदार्थांची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र आणि प्रभावी यंत्रणा उभी करावी, अन्यथा सार्वजनिक आरोग्य धोक्यात येऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

शहरातील अनधिकृत बॅनर व फलकांवर कठोर कारवाई करून शहराचे विद्रूपीकरण थांबवावे, असे सांगताना त्यांनी नमूद केले की, अशा बॅनरमुळे भीमसृष्टी तसेच इतर महापुरुषांच्या प्रतिमांची विटंबना होत आहे. याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवून त्याचे सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी त्यांनी सभागृहात मांडली. शहराच्या वैचारिक ओळखीशी निगडित असलेल्या या स्मारकाचे जतन आणि उन्नती करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. या शिवाय त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्याची शहरात उभारणी करण्यात यावी,यासह प्रभागातील विकासाबाबतची मागणी त्यांनी केली.

नगरसेविका मीनाताई चौहान यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने ठोस आणि सकारात्मक निर्णय घ्यावेत, अन्यथा पुढील सभेत अधिक आक्रमक भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

## नेकनूर-येळंब हायवे पूर्ण अंधारात

जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वास्तविक संबंधित संपूर्ण रस्त्याची आणि स्ट्रीट लॅम्प यांची जबाबदारी टोल कंपनी यांची असताना निकृष्ट सेवा देऊन पूर्ण टोल वसुली चालवली आहे जे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. संबंधित केज मतदार संघाचे माननीय आमदार त्याच रस्त्यावरून त्यांच्या CONVOY सोबत प्रवास करत असताना त्यांच्या निदर्शनास इतकी गंभीर त्रुटी कशी लक्षात आली नाही याबाबत स्थानिक जनतेमध्ये आश्चर्य असल्याचे ॲड.शार्दुल देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## राज्यभरातील सोनोग्राफी केंद्रांची तपासणी..

विक्री करण्याचा बेकायदेशीर प्रकार स्थानिक पोलीस आणि शासकीय आरोग्य यंत्रणेने उघडकीस आणला. त्यानंतर या प्रकरणामागील मोठे रॅकेट समोर येत आहे. सुरुवातीला तीन महिलांना अटक करण्यात आली होती, त्यानंतर आणखी दोघांना अटक करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर, या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी गुरुवारी कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेला भेट दिली. यावेळी त्यांनी बेकायदेशीर आयव्हीएफ आणि सोनोग्राफी केंद्रांच्या तपासणीचे आदेश दिले. यावेळी पोलीस उपायुक्त सचिन गोरे, जिल्हा शल्यचिकित्सक कैलास पवार, नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्षा प्रियांका दामले यांनी प्रकरणाची माहिती रूपाली चाकणकर यांना दिली.

## सायं.दैनिक सिटीझन कार्यालयाची तोडफोड १५ जणांवर गुन्हा दाखल

दरवाजा, खुर्च्यांचे नुकसान झाले. सदरील घटनेनंतर शहर ठाण्याचे पो.नि.शितलकुमार बल्लाळ यांच्यासह सहकार्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी कार्यालयात सर्वत्र काचाचे तुकडे, नुकसानग्रस्त संगणक, अस्थाव्यस्थ खुर्च्या दिसुन आल्या. सदरील घटनेची माहिती पसरताच सायं.दै.सिटीझन कार्यालयासमोर मोठी गर्दी झाली होती. या प्रकरणी काल रात्री उशिरा संपादक शेख मुजीब यांच्या फिर्यादीवरून अहेमद खान लियाकत खान, अयान इरशाद शेख, शेख बिलाल शेख रज्जाक व इतर १० ते १२ जणांविरूध्द शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सपोनि बाबासाहेब राठोड व सहकार्यांनी भेट देऊन पंचनामा केला असून सिटीझन कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज घेतले आहेत. सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी सुरू असुन त्यामधुन आणखी काही जणांची नावे समोर येणार आहेत.

## वर्षातलं पहिलं चंद्रग्रहण उद्या...

दिसतो. यालाच लोकप्रिय भाषेत ब्लड मून किंवा रक्तचंद्र म्हटले जाते. त्या रात्री आकाशात गडद लाल छटा दिसण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रातील शहरांमध्ये किती वेळ दिसेल ?

ग्रहणाची समाप्ती सायंकाळी ६ वाजून ४८ मिनिटांनी होणार आहे. त्यामुळे प्रत्येक शहरात चंद्रोदयानंतर ते ६.४८ पर्यंतच ग्रहण दिसेल.

मुंबई -चंद्रोदय ६.४५ ; ग्रहण फक्त सुमारे ३ मिनिटे

पुणे - ६.४१ ; सुमारे ७ मिनिटे, नाशिक - ६.४० ; सुमारे ८ मिनिटे

कोल्हापूर - ६.४० ; सुमारे ८ मिनिटे, नागपूर - ६.१८ ; सुमारे ३० मिनिटे (सर्वाधिक वेळ), सोलापूर - ६.३३ ; सुमारे १५ मिनिटे, रत्नागिरी - ६.४४ ; सुमारे ४ मिनिटे,छत्रपती संभाजीनगर ६.३४ ; सुमारे १४ मिनिटे

यावरून दिसते की विदर्भातील भागात ग्रहण अधिक वेळ पाहता येईल, तर कोकण आणि मुंबई परिसरात ते अतिशय कमी वेळासाठीच दृश्य असेल.

भीती नव्हे, विज्ञानाची दृष्टी आवश्यक

गेल्या काही दिवसांत समाजमाध्यमांवर चंद्रग्रहणाबाबत विविध अफवा आणि भीती पसरवली जात आहे. मात्र तज्ज्ञांच्या मते, ग्रहण ही पूर्णपणे नैसर्गिक खगोलीय घटना आहे. शिक्षक आणि पालकांनी मुलांना प्रत्यक्ष हे दृश्य दाखवून त्यामागील विज्ञान समजावून सांगावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

काय लक्षात ठेवावे ?

चंद्रग्रहण पाहण्यासाठी विशेष साधनांची आवश्यकता नाही. मात्र क्षितिज स्पष्ट दिसेल अशा मोकळ्या जागेतून निरीक्षण केल्यास दृश्य अधिक स्पष्टपणे पाहता येईल. ३ मार्चच्या संध्याकाळी काही मिनिटांचा हा दुर्मिळ 'रक्तचंद्र' म्हणजेच ब्लड मून अनुभवण्याची संधी खगोलप्रेमींनी दवडू नये.

## भारताचा वर्ल्डकप सेमी फायनलमध्ये प्रवेश

ठेवले होते. या विजयासह भारताचा सेमी फायनलमध्ये इंग्लंडसोबत सामना होणार आहे.

भारताची गोलंदाजी

भारताने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. वेस्ट इंडिज कडून सलामीला शाई होप आणि रोस्टन चेस उतरले होते. तर भारताकडून अर्शदीप सिंहने पहिली ओव्हर टाकली. पहिल्या ओव्हर मध्ये अर्शदीपने फक्त तीन धावा देत नंतर हार्दिकने वेस्ट इंडिज काहीसा दबाव टाकला होता. मात्र त्यानंतर तिसऱ्या ओव्हरनंतर कॅरेबियन खेळाडूंनी आक्रमक पवित्रा घेतला. पॉवर प्लेमध्ये वेस्ट इंडिजने एकूण बिनबाद ४५ धावा केल्या होत्या. यामध्ये अभिषेक शर्मा याने चेज याचा झेल सोडला, त्यासोबतच वरूणने रन आऊटची एक संधी गमावली.वरूण चक्रवर्ती संथ गतीने खेळत असलेल्या शाई होप याला ३२ धावांवर गेला. त्यानंतर आलेल्या हेटमायर याने आक्रमण करायला सुरूवात केली. दुसऱ्या बाजूने चेज याने एक बाजू लावून धरली होती. जसप्रीत बुमराहने १२ व्या ओव्हरमध्ये हेटमायर आणि चेज याना आऊट करत कमबॅक करून दिले होते. त्यानंतर पॉवेलने आक्रमक नाबाद ३४ धावा केल्या. त्यासोबतच जेसन होल्डरनेही २२ चेंडूत ३७ धावा करत २०० च्या जवळ टार्गेट पोहोचवले. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक २ विकेट घेतल्या.

भारताची फलंदाजी

भारताची आजही सुरूवात चांगली राहिली नाही. संजू आणि अभिषेकची जोडी जमू लागली असं वाटत होतं. मात्र तिसऱ्या ओव्हरमध्ये अभिषेक शर्मा (१० धावा) मोठा फटका मारण्याच्या नादात कॅच आऊट झाला. त्यानंतर आलेल्या ईशान किशनने दोन चौकार मारत सुरूवात केली पण तोही पॉवर प्ले मध्ये मोठा फटका मारताना १० धावा करूनच आऊट झाला. संजू सॅमसन आणि सूर्यकुमार यादवने मोर्चा आपल्या हाती घेतला. संजूने पॉवर प्ले संपल्यावरही आपला दांडपट्टा सुरू ठेवला होता. सूर्या १८ धावांवर आऊट झाला, त्यानंतर आलेल्या तिलक वर्मा यांनी भागीदारी करायला सुरूवात केली. सूर्याची विकेट गेल्यावर सामना थोडासा फसल्यासारखा वाटत होता. पण तिलकने आक्रमण सुरू केले आणि पुन्हा एकदा सामना काहीसा भारताच्या बाजूने झुकला. तिलक बाद झाल्यावर हार्दिकही आला आणि १७ धावा करून परतला होता. शेवटी सामना अटीतटीचा होतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र संजून आणि दुबेने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

## नगर परिषदेच्या अध्यक्षांनाही नगरसेवक पद

३४१ब-१अ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव होता.

या प्रस्तावात असे स्पष्ट केले गेले की, अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली आणि नगरसेवक म्हणून निवडून आलेली व्यक्ती एकाच वेळी दोन्ही पदे भूषवू शकेल, असे विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या विधेयकाच्या मसुद्यात म्हटले आहे. अशा व्यक्तीला अध्यक्ष म्हणून किंवा नगरसेवक म्हणून फक्त एकच मत असेल आणि मतांची समानता असल्यास, अध्यक्षांना निर्णायक मत असेल, असा प्रस्तावही ठेवण्यात आला होता.

सरकारने गेल्या वर्षी २६ डिसेंबर रोजी एक अध्यादेश काढला होता. राज्य विधिमंडळाच्या कायद्याद्वारे अध्यादेशाची जागा घेण्याचा हा विधेयकाचा हेतू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे शशिकांत शिंदे म्हणाले की, सत्ता हस्तगत करण्यासाठी विधेयक आणले जात आहे आणि ते लोकशाहीचा गळा दाबण्यासारखे आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत आणि औद्योगिक वसाहती (सुधारणा) विधेयक, २०२६ शुक्रवारी विधानपरिषदेने मंजूर केले. ते यापूर्वी विधानसभेने मंजूर केले होते.

सध्या, नगरपरिषदा, नगरपंचायत आणि औद्योगिक वसाहतींचे अध्यक्ष थेट निवडले जातात.

पान ६ वरून

## क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल विद्यार्थ्यांचे

त्यामध्ये बिक्कड सखाराम बालासाहेब या विद्यार्थ्याने १०० मीटर धावणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, २०० मीटर धावणे स्पर्धेत तांदळे ऋषीकेश मधूकर या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला, ४०० मीटर धावणे या स्पर्धेत घुले राहुल प्रकाश या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.तसेच लांबउडी स्पर्धेत तांदळे विठ्ठल सदाशिव याने प्रथम क्रमांक मिळवला तर गोळा फेक स्पर्धेत चौरे हनुमंत दत्तु या विद्यार्थ्याने दूतिय क्रमांक पटकावला आसून सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे,अतुल मुंडे, शाळेचे प्राचार्य शेख फैयाज लतिफ,प्रा.श्रीकांत माने,प्रा.विलास ठोंबरे,प्रा.अर्जून कानडे,ठोंबरे एस.बी,घोडके एस.एम, सोनवणे एस.बी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## बिबट्यापासून सुरक्षेसाठी शेतकऱ्यांना कॅमेरे व अलार्म यंत्रणा

त्यांनी केली. तसेच बिबट्या साधारण १५० ते २०० मीटरच्या परिसरात आल्यास त्वरित पूर्वसूचना देणारी अलार्म प्रणाली, सेन्सर किंवा अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शेतकऱ्यांचे जीवित सुरक्षित ठेवणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी असून वनविभाग, महसूल प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी समन्वय साधून विशेष कृती आराखडा राबवावा, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली. त्यांच्या या मांडणीमुळे बिबट्याच्या धोक्याचा प्रश्न अधिवेशनात केंद्रस्थानी आला आहे.

## पुण्य कर्म करणारा माणूस देव माणूस होतो

या जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर बोलतांना ह भ प रंधवे महाराजांनी अप्रतिम आणि मनाला भिडणारे, मंत्रमुग्ध करणारे निरुपण केले. याप्रसंगी बोलताना ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज म्हणाले, सेवेत तन लावा. सत्कार्याला धन लावा. आणि परमार्थ मनोभावे करा. विचार बदललेले की जीवन बदलेल विचार बदलले की कृती बदलेल आणि विचार बदलला तर माणूस बदलेल विचार बदलल्यामुळेच जागृती होईल माणसं ही भगवंताची रूपे आहेत. देवाची सेवा करणारा देव माणूस होतो. पुण्यवान होतो. त्यामुळे प्रत्येकांनी पुण्यकर्म करावे. माणसे श्रीमंत असतील परंतु ती माणसं बेचैन असतात. परमार्थाला दुःखमुक्त करण्यासाठी असतो. पैशापेक्षा पुण्य श्रेष्ठ आहे. जीवनात पुण्यकर्म करावे. असेही सांगून त्यांनी विविध दृष्टांत दिले. भाविकांच्या हृदयाला भिडणारे रंगतदार कीर्तन त्यांनी केले.कीर्तनास मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे गायनाचार्य हनुमंत महाराज येवले बंडू महाराज जटाळ, अंगद महाराज सोनवणे, किसन महाराज, अंगद महाराज मोरे, विणेकरी वाल्मीक महाराज चाटे, आदींची उपस्थिती होती.कीर्तनास पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, प्राचार्य डॉ. वसंत सानप, डॉ. प्रा. दत्तात्रय आघाव, बाजीराव खेडकर, हरिदास जोगदंड, प्रा. आर.टी. गर्जे, ड. जयंत राख राजेंद्र सानप, नारायण नागरे, नाना सानप, आदीसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ संपन्न

हा सोहळा प्रतिष्ठानच्या रोहिणीताई गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी केले होते. कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली ती प्रमुख उपस्थिती राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची पारंपरिक कोळी वेशातील दमदार एन्ट्री. तसेच प्रतिष्ठान अध्यक्षा द्रौपताबाई पठारे, ज्येष्ठ समाजसेवक कैलास दादा पठारे, विठ्ठल मूर्तीवार, मंजू ताई पठारे, अक्षय कलाकार, बंडोपंत सोळुंके, चित्रपट मंडळाचे प्रशांत होर्शीळ सर, समाजसेवक सुशीलजी खटोड, एम.एस. कन्स्ट्रक्शनचे संचालक साथीराम अण्णा ढोले, ओबीसी फाऊंडेशनचे लक्ष्मण लटपटे, अहिल्यानगर येथील संतोष अवताडे, तसेच सोशल मीडियावर लोकप्रिय असलेले इंस्टाग्राम रील स्टार लखन चव्हाण, ओम पावले, खंडू तात्या आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सन्मानितांमध्ये प्रमोद रामदासी, लक्ष्मीकांत रुईकर, आदिम राज बहुउद्देशीय संस्था (रामू मोते), सुशील हरिभाऊ कोळेकर, पसायदान सेवा केंद्रचे गोवर्धन दराडे, सरोज आनंदकर (नागपूर), संगीता माने (क्राईम ब्रँच, मुंबई), प्रमोद गोरक्षनाथ चांदणे, प्राची चांदणी, देविदास उत्तम शेलार, नयना रतन कानडे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी प्रभावीपणे केले. प्रतिष्ठानचे सदस्य गणेश माने, किशोर कुलकर्णी, प्रकाश देवा, जाकीर भाई, विकास धोत्रे, गुड्ड्या जोगदंड, महादेव सवाई, मीनाक्षी देवकते, नयना भाकरे, नेहा साबळे व इतर सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.भव्य-दिव्य स्वरूपात पार पडलेल्या या सोहळ्याच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे.

## आ.सुरेश धस यांना सोशल मीडियावरून जीवे

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो, असेही तक्रारदारांनी म्हटले आहे.लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींविरुद्ध उघड धमक्या देणे ही अत्यंत गंभीर व दंडनीय बाब आहे. सामाजिक माध्यमांचा गैरवापर करून सार्वजनिक शांतता भंग करण्याचा आणि वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही समर्थकांनी केला आहे.या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तातडीने कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे.दरम्यान, तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने संबंधित पोस्टची पडताळणी सुरू केली असून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. या घटनेच्या निषेधार्थ आष्टी, अंभोरा व कडा येथे आ. धस यांचे हजारो समर्थक उपस्थित राहून संताप व्यक्त केला.

## घरकुल लाभार्थ्यांची सन २०२३ ते २५ पर्यंतची यादी प्रसिध्द करा- जाधव

महत्त्वाचे म्हणजे नांदूर घाट ग्रामपंचायत या ठिकाणी प्रस्ताव भरपूर प्रमाणात गेले आहेत व घरकुल देखील मोठ्या प्रमाणात आले आहेत बहुतांश लोकांचे फक्त एक हप्ता १५००० रुपये पडले असून पुन्हा पैसे आले नाहीत हे पैसे नेमके आलेत की नाही याची सहानिशा होणे गरजेचे आहे कारण नुकतेच जवळपास १५ ते २० घरकुलाची रक्कम बाहेरगावचे तसेच परराज्यातील व्यक्तीच्या नावे आल्याचे उघड झाले आहे त्यामुळे एकदा लाभ घेतला तर पुन्हा लाभ त्या व्यक्तीला मिळणार नाही त्याच्या नावावर कुणी पैसे उचलले असतील आणि घरकुलामध्ये त्याचे नाव असेल हे त्या व्यक्तीला सुद्धा कळेल त्यासाठी लाभार्थी व्यक्तींचे पूर्ण नावे व त्याच्या खात्यावर आलेली रक्कम ग्रामपंचायत समोर तसेच सार्वजनिक ठिकाणी यादी प्रकाशित करावी नसता पंचायत समिती मधून मागणी करून माहिती अधिकारात वैयक्तिक स्वरूपात बॅनर लावून सर्व लाभार्थ्यांचे यादी प्रदर्शनी य भागात लावले जातील असे देखील ग्रामपंचायत सदस्य सोनाली जाधव यांनी म्हटले. नांदूर घाट मधील घरकुल व विहीर हे वैयक्तिक लाभ आहेत परंतु त्या लाभार्थ्यापर्यंत तो लाभ पोहोचला की नाही हे सुद्धा महत्त्वाचे असून जे दोषी असतील त्यांच्यावर रीतसर कारवाई होणे गरजेचे असल्याचे देखील म्हटले आहे पुढील आठ दिवसाच्या आत ग्रामसेवक व ग्रामपंचायत नांदूर घाट सरपंच उपसरपंच यांनी लाभार्थी यांची यादी तात्काळ उपलब्ध करून ग्रामपंचायत समोर बॅनर लावण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य सोनाली जाधव सह ग्रामस्थांनी केली आहे.

## आझाद हिंद सेमी इंग्लिश, उर्दू शाळेत सायन्स डे

शुभस्ते करण्यात आले.समवेत विषय तज्ञ मो. इसहाक, डीडब्लूओ शोएब शेख, संस्था सचिव शेख मुसा, शेख वाजेद, सय्यद असेफ आदी उपस्थित होते. यावेळी मुलांना, पालकांना संबोधित करताना डॉ. मुजाहेद म्हणाले की, कुराणमध्ये स्पष्ट सांगितली की वाचा -पढो म्हणजे विज्ञानवादी होऊन जगाला खरे ज्ञान मिळवून द्या. डॉ. हजारी म्हणाले की, विज्ञानामुळे अंधश्रद्धा दूर होऊन योग्य मार्ग सापडतो. तरड. शफिक भाऊ यांनी मुलांना शाळेने सर्व उपक्रम राबून प्रगत देशा बरोबरीने ज्ञान उपलब्ध करून द्यावे असे प्रतिपादन केले. मुलांनी केलेले प्रत्यक्षिक प्रयोग पाहून मान्यवरांनी कौतुक करून काही सुधारणा सुचवल्या एकूण बारा प्रयोग निवडून पहिले चार ला प्रथम, दुसरे, तिसरे बक्षीसे देऊन मुलांचा आत्मविश्वास वाढवला.कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन मुअ बशीर सिद्दीकी, सय्यद अवेज, शेख अय्याज, शेख मुद्दशीर, शेख फैसल यांनी केले. विज्ञान प्रदर्शनीचा मुला बरोबर पालक व परिसरातील नागरिकांनी आनंद घेतला.

## शेख मोहम्मद याचा पहिला रोजा पूर्ण

लहान वयातही धार्मिक संस्काराची जपणूक करत त्याने पूर्ण दिवस उपवास पाळला. घरातली मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करून आणि कुरआन पठण ऐकत त्यांनी रोजाचा दिवस शांतपणे व्यतित केला. संध्याकाळची अजान होताच कुटुंबांच्या उपस्थितीत खजूर व पाण्याने रोजा सोडण्यात आला. याबद्दल शेख मोहम्मद याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## बाजीराव चव्हाण यांच्या वतीने

मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकाराने एक लाख पाण्याच्या बाटल्या, एक लाख बिस्किटांच्या पाकिटांचे वाटप तसेच निःशुल्क आरोग्यसेवेची व्यवस्था करण्यात आली. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांनी निःशुल्क सेवेची पाहणी करून युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण व संपूर्ण टीमचे कौतुक केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २ मार्च २०२६ पान -३


## वादळी वाऱ्याने सौर पॅनलचे नुकसान कंपनीने त्वरित भरपाई करून द्यावी

बीड दि १(प्रतिनिधी)- नुकत्याच झालेल्या वादळासह अवकाळी पावसाने गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील दामुनाईक तांडा येथील शेतकरी राजाभाऊ झापानाईक चव्हाण यांच्या शेतातील सौर कृषी पंपाच्या सोलर पॅनेलचे मोठे नुकसान झाले आहे. सोलर पॅनेल तुटून वाकले असून संपूर्ण यंत्रणा निकामी झाली आहे. त्यामुळे शेतातील पिकांना पाणी देणे कठीण झाले असून शेतीचे कामकाज अडचणीत आले आहे.पत्रकात म्हटले आहे की, सदर सोलर पॅनेल हे शक्ती नावाच्या सोलर कंपनीमार्फत बसविण्यात आले होते. नुकसान झाल्यानंतर संबंधित कंपनीकडे वारंवार मागणी करूनही अद्याप नुकसानभरपाई अथवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

## अभिनव पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

दिंद्रुड दि. २८ (प्रतिनिधी) - येथून जवळच दिंद्रुड- परळी हायवे लगत असलेल्या अभिनव पब्लिक स्कूल संगम मध्ये बाल विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. फिनिक्स इंटरनॅशनल स्कूल चे संस्थापक नागसेन कांबळे, फ्लाईंग बर्ड स्कूलचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, विजयश्री दराडे मॅडम, ॲड. विकास मिसाळ, खोलेश्वर विद्यालयाचे संस्थापक दिलीपराव पारेकर, जिजाऊ ज्ञान मंदिर उमरीचे गणेश घायतिडक, ज्ञानगंगा इंग्लिश स्कूलचे कांबळे सर, प्रा.रमेश गटकळ, सोमनाथ लटपटे, पत्रकार प्रकाश काशिद, संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, नवनाथ कांबळे या मान्यवरांची प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार व चंद्रकांतआबा लाटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.दराडे मॅडम, नागसेनजी कांबळे, चांडक यांनी मार्गदर्शन पर भाषण केले तरचिमुकल्या विद्यार्थ्यांनी एक से बढकर एक अशा विविध गीतावर, रंगीबेरंगी फॅन्सी ड्रेसेसमधे छान सादरीकरण करून प्रेक्षक, माता-पालकांना मंत्रमुग्ध केले होते. बाळ किसन कटारे यांनी सूत्रसंचालन केले तर अभिमान पारेकर सर यांनी आभार मानले.

## विद्यार्थी अमर ताटे याचा डॉ.ज्योतीताई कडून गौरव



बीड दि १ (प्रतिनिधी)- तालुक्यातील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थी अमर सतीश ताटे याने एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या यशामुळे संपूर्ण चाकरवाडी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले तर त्याच्या या यशाबद्दल
डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला .
हा सन्मान सोहळा बाळनाथ विद्यालय चाकरवाडी येथे पार पडला. या वेळी डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते अमरचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. डॉ. मेटे यांनी अमरच्या यशाचे कौतुक करताना, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करावीत,'' असा प्रेरणादायी संदेश दिला.अमरच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले असून त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## धुळवडीच्या तोंडावर अंबाजोगाई शहरात १३ लाख ७० हजार रुपयांचा गांजा पकडला ; चार आरोपींना अटक

अंबाजोगाई दि १ (प्रतिनिधी)-धुळवंडीचा सण दोन दिवसांवर आला असतानाच शहरात चारचाकी वाहनातून विक्रीसाठी नेला जात असलेला सुमारे १३ लाख ७० हजार ८६० रुपयांचा गांजा स्थानिक गुन्हे शाखा व अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने जप्त केला. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून २८ किलो गांज्यासह चारचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात धडक मोहीम सुरू आहे. त्यानुसार दि. २८ फेब्रुवारी शनिवार रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, अंबाजोगाई येथील सटवाजीनगर परिसरातील ड्रीमसिटी भागात चारचाकी वाहनातून गांजाची अवैधरित्या वाहतूक होणार आहे. अशी मिळालेल्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने अंबाजोगाई शहर पोलीसठाण्याच्या अधिकाऱ्यांसह सटवाजीनगर, ड्रीमसिटी येथील सिमेंट रस्त्यावर सापळा रचला. संशयित पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये दोन निळ्या रंगाच्या प्लास्टिक पोत्यांमध्ये पान, फुल, बिया बोंड असलेला उग्र वासाचा ओलसर गांजा आढळून आला. वजन केल्यावर सुमारे २८ किलो गांजा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी प्रतिम राम तरकसे (वय २७), रा. आडस, ता. केज, जि. बीड याच्यासह प्रतिक भगवान पाटोळे, अजय पाटोळे, दोन्ही रा. आसरडोह, ता. धारूर, जि. बीड व अजय देवकर, रा. अंदोरा, ता. कळंब, जि. धाराशिव यांना ताब्यात घेण्यात आले आहे.या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८३/२०२६ कलम २०, ८ (सी) गुंगीकारक औषधी द्रव्य व २०२६ परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद जोगदंड करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, सहायक पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने संयुक्तरित्या पार पाडली.

## अंबाजोगाई पुस्तकांचे गाव म्हणून विकसित होणार

अंबाजोगाई दि १(प्रतिनिधी)- अंबाजोगाई शहराला पुस्तकांचे गाव म्हणून विकसित करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पात सहभागी होण्यासाठी प्रशासनाने शहरातील संस्था, नागरिक यांच्या कडून प्रस्ताव मागवले आहेत.
महाराष्ट्र राज्याच्या उद्योग व मराठी भाषा मंत्र्यांनी अंबाजोगाई ला पुस्तकांचे गाव घोषित केल्या नंतर बीड जिल्हाधिकारी यांनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी अप्पर जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांची समनवय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.राज्य मराठी विकास संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या प्रकल्पाचा सर्वकश शासन निर्णय अद्याप प्रलंबीत असला तरीही त्यापुर्वी शहरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सं स्था,नागरिक यांची यादी तयार करण्यासाठी अंबाजोगाई तील इच्छुकानी आपले प्रस्ताव दि १० मार्च २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे . विहित मुदतीनन्तर अर्जाचा कसलाही विचार केला जाणार नाही असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## स्वच्छ बीड सुंदर बीडचे स्वप्न साकारण्यासाठी निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचा पाठिंबा

बीड दि १(प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना जिल्हा शाखा बीड च्या पदाधिकाऱ्यांनी २६ फेब्रुवारी रोजी नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची कार्यालयामध्ये भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सदरील प्रसंगी ''स्वच्छ बीड सुंदर बीड''चे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी व नवनिर्वाचित सर्व पदाधिकारी यांना संघटनेचा सदैव सक्रिय सहभाग आणि पाठिंबा राहील याबाबत आश्वासित केले

. सदरील प्रसंगी बीड शहरामध्ये सध्या भेडसावणाऱ्या विविध समस्यांविषयी चर्चा केली सद्यस्थितीत नगरपरिषद कर्मचारी करत असलेल्या शहर स्वच्छतेबाबत असणाऱ्या अनेक त्रुटी मुख्याधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्या, त्यांना प्रत्यक्ष रस्त्यावरील व मोकळ्या प्लॉटमधील कचऱ्यांच्या ठिकाणचे फोटो आणि व्हिडिओ दाखवण्यात आले. याप्रसंगी शहराला पंधरा दिवसाऐवजी सात दिवसांनी पाणीपुरवठा कसा करता येईल याबाबत तांत्रिक समिती नेमणूक योग्य कारवाई करण्यासाठी विनंती करण्यात आली, मुख्याधिकारी यांनी त्यांच्या स्टाफला जो कोणी रस्त्यावरती व मोकळ्या प्लॉटमध्ये कचरा टाकतील त्यांच्यावरती नगरपरिषद नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी असे आदेश दिले, घंटागाड्या वेळेवर येत असल्याचेही निदर्शनास आणून दिले.

याप्रसंगी संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक डी. जी.तांदळे, प्रल्हाद जावळे, अध्यक्ष इंजि. जे.



एन. भोरे, सचिव इंजि.कांचन गायकवाड, कार्याध्यक्ष गौतम चोपडे, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम पवार -ठाकूर, सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य अधिकारी चव्हाण साहेब, बागडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी संघटना ही ''स्वच्छ बीड सुंदर बीड''चे स्वप्न साकार करण्यासाठी सदैव आपल्या पाठीशी खंबीर व सक्रियपणे उभा आहे याबाबत लेखी पाठिंबा दिला.

## श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय पिंपळवंडी येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

पिंपळवंडी दि.१(प्रतिनिधी)-पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रताप पवर सर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा गौरव दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता आणि कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन केल्यानंतर विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा वारसा सांगणारी थोर संतांची अभंगवाणी,पोवाडे आणि मराठी अभिमान गीतांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या गाजलेल्या कवितांचे काव्यवाचन करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यालयाच्या परिसरातून ग्रंथ दिंडी काढण्यात आली.ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मराठी साहित्यातील थोर ग्रंथांच्या पालखीसह लेझीमच्या तालावर सहभाग नोंदवला. विद्यालयाचे मराठी विषयाचे शिक्षक प्रताप पवार सर यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले.ते म्हणाले की,मराठी केवळ एक भाषा नसून तो आपल्या संस्कृतीचा कणा आहे. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.एम.पवार सर व शिक्षक-वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनीने केले,तर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## केज येथील बसस्थानकात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

केज दि १(प्रतिनिधी)- मराठी म्हणजे महाराष्ट्र, मराठीला माय म्हणून मराठी राजभाषाचा आदर करणाऱ्या सर्व प्रवासी व नागरिकांना मराठी दिन साजरा करून मराठी राजभाषा भाषा दिनानिमित्त धारूर आगार अंतर्गत केज बसस्थानकात शुभेच्छा देण्यात आल्या.
किल्ले धारूर आगार प्रमुख नवनाथ चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वाहतूक निरीक्षक बाबासाहेब कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत व ज्येष्ठ पत्रकार दैनिक चंपावती चे केज तालुका प्रतिनिधी धनंजय(मामा)देशमुख, यांच्या उपस्थितीत कवि श्रेष्ठ विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती अर्थात मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला.सर्वप्रथम



उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कवि श्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप-दीपाने पूजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे व प्रवाशांचे पुष्पगुच्छ आणि मिठाई देऊन सन्मान करण्यात आला.
यावेळी सहाय्यक निरीक्षक बाबासाहेब कदम,ज्येष्ठ पत्रकार धनंजय(मामा)देशमुख, वरिष्ठ लिपिक बालाजी बिक्कड,वाहतूक नियंत्रक बाळासाहेब, परमेश्वर मुंडे,राजेभाऊ शिंदे,अनिल क्षिरसागर यांच्या सह प्रवासी उपस्थित होते.

## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी): येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवार, दि. २८ रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी. डी. राऊत, गुरुकुल कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल तसेच डॉ सुनील जोंधळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांनी अध्यक्षस्थान भूषवून मान्यवरांचे स्वागत केले. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देणारे विचार मांडले.

## एमडी शिक्षणासाठी निवड झाल्याने लिंबागणेशचे भूमिपुत्र डॉ.विशाल मुळे ग्रामस्थांकडून सत्कारित



लिंबागणेश दि १ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र डॉ. विशाल मुळे यांनी एमबीबीएस शिक्षण पूर्ण करून पदव्युत्तर एम.डी. (फार्माकोलॉजी) अभ्यासक्रमासाठी निवड मिळविल्याबद्दल सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन वडील कल्याण,आई मीरा मुळे यांचा सहकुटुंब हृद्य सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी सरपंच बाळकृष्ण मुळे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, बाळकृष्ण थोरात,पत्रकार हरिओम क्षीरसागर, रमेश गायकवाड, ॲड.गणेश वाणी, रामकिसन गिरे,संदीप मुळे, संतोष भोसले, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, रामदास मुळे, शहादेव धलपे, नाना वाणी, किसन आबदार, सुभाष मुळे, विनायक वाणी, रामकिसन गिरे, कृष्णा पितळे, रामचंद्र मुळे , जयदेव गिरे,हौसराव भोजणे, शिवाजी वाणी, श्रीराम वायभट,जिवन मुळे,प्रविण मुळे, रोहित तागड,संभाजी मुळे, प्रकाश मुळे, विश्वंभर मुळे,नवनाथ मुळे, बालाजी मुळे, सोनाली मुळे,मीरा मुळे,आदी मान्यवर उपस्थित होते.

## बबन मोघे यांच्या पुढाकाराने गेवराई तालुक्यात युवा सेनेच्या ११ शाखांचे उत्साहात उद्घाटन




गेवराई दि.१ (प्रतिनिधी) - युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व गेवराईचे युवा सेना तालुकाप्रमुख बबन आप्पा मोघे यांच्या पुढाकाराने गेवराई तालुक्यात ११ नवीन शाखांचे भव्य उद्घाटन शुक्रवारी मोठ्या उत्साहात करण्यात आले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संसदरत्न खासदार डॉ.श्रीकांत शिंदे तसेच पूर्वेस सरनाईक यांच्या आदेशाने हा शाखा विस्तार सोहळा पार पडला. गेवराई तालुक्यातील धोंडराई सर्कलमधील राजप्रिंप्री, महादेव तांडा, माटेगाव, देवप्रिंप्री, ब्रह्मगाव, भाट अंतरवाली, वाघदरा तांडा, खळेगाव, आहेर वस्ती, चव्हाणवाडी आदी गावांमध्ये नव्या शाखांचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत आप्पा नवले, युवा सेना जिल्हाप्रमुख अजय भैय्या सुरवसे, सुमित भैय्या कोळपे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायण शिंदे, शहर प्रमुख मुकेश अण्णा महाजन, ज्येष्ठ नेते लिंबाजी मामा जाधव, जिल्हा संघटक विक्रम भोसले, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, युवा सेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, शहर प्रमुख गणेश पवार, धोंडराई सर्कल प्रमुख अंकुशराव मोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते. या शाखा उद्घाटनामुळे गेवराई तालुक्यात युवा सेनेचा प्रभाव अधिक दृढ झाला असून युवकांमध्ये पक्षाबद्दल उत्साह वाढताना दिसत आहे. बबन मोघे यांच्या नेतृत्वाखाली येत्या काळात आणखी शाखा विस्तार व विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार असल्याचे संकेत यावेळी देण्यात आले. यावेळी बोलताना बबन मोघे यांनी प्रत्येक गावात सक्रिय पदाधिकारी निर्माण करून पक्षाची मजबूत मोट बांधणार असल्याचे स्पष्ट केले.

## हिंगणे खुर्द जि प. शाळेच्या मुलींनी पटकावला जिल्हा अजिंक्यपद ; विभागीय स्पर्धेसाठी निवड

बीड दि १(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुलींच्या कबड्डी संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या अभिमानास्पद यशानिमित्त हिंगणी खुर्द ग्रामस्थांच्या वतीने विजेत्या संघाचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. चेअरमन सचिन आंधळे यांचे शाळेला सहकार्याचे अभिवचन दिले. कार्यक्रमाचे आयोजन चेअरमन सचिन दादा आंधळे, माजी सरपंच भागवत आंधळे, पप्पू आंधळे, बळीराम मुंडे तसेच शिक्षणप्रेमी ज्ञानेश्वर आंधळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. यावेळी विजेत्या खेळाडूंचा पुष्पगुच्छ व सत्कारचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या मेहनतीचे व क्रीडाशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक प्रभाकर आंधळे यांनी केले, तर आभार आदर्श शिक्षक ढवळे यांनी मानले. यावेळी शिक्षक शेख सर, तांदळे मॅडम, धनवे मॅडम तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## अखेर त्या संशयास्पद दिव्यांगत्व तपासणीमध्ये अधिकाऱ्यांनी घातला प्रशासकीय नियमांचा घोळ

बीड दि १(प्रतिनिधी) - सद्यस्थितीत शासकीय व निमशासकीय कार्यालयातील संशयास्पद दिव्यांगत्व धारण केलेल्या कर्मचाऱ्यांची शोध मोहीम शीघ्रगतीने कार्यान्वित करून अशा संशयास्पद आढळणाऱ्या व दिव्यांगत्व धारण केलेल्या कर्मचाऱ्यांविरुद्ध दिव्यांग व्यक्ती विरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना लागू असणाऱ्या सेवाशर्ती अन्वये उचित कठोर कार्यवाही करावी, या स्वरूपाचे आदेश दिव्यांग कल्याण विभागात कार्यरत असलेले सचिव तुकाराम मुंढे यांनी सर्व शासकीय प्राधिकरणांना दिले असूनही या आदेशाची अंमलबजावणी आजतागायत झालीच नाही. महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी संशयास्पद दिव्यांगत्व धारण केलेल्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कठोरात कठोर कारवाई करण्याबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. तरीही त्या संशयास्पद दिव्यांगत्व तपासणीमध्ये अधिकाऱ्यांनी प्रशासकीय नियमाचा घोळ घातल्याचे मत अशोक आठवले यांनी व्यक्त केले आहे.

यात नमूद केली की अस्थिव्यंग संशयास्पद शिक्षक कर्मचारी, २४ अल्पदृष्टी संशयास्पद शिक्षक कर्मचारी व ३९ कर्णबधिर संशयास्पद शिक्षक कर्मचारी यांची तपासणी करणेबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने नियमबाह्य रितीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयीन प्रशासनास कळवले होते. या नियमबाह्य आदेशावर दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी गंभीर आक्षेप घेवून अशा कर्मचाऱ्यांची तपासणी वैद्यकीय अपिलीय प्राधिकरणाकडुन करावी, या स्वरूपाची तक्रार माहिती अधिकार अर्जाद्वारे करून माहिती उघड करण्याबाबत आग्रहाचा पाठपुरावा केला होता. दरम्यान संशयास्पद दिव्यांगत्व शोध मोहीम गतिमान करताना तपासणी बाबत आदेशित केले होते.जे की, निर्गमित केलेले आदेश हे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तरतुदी विरोधी असुन अशा संशयास्पद दिव्यांगत्व धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्यायालयात जाण्याकरिता संधी उपलब्ध करून देणारे आहेत.म्हणजेच वैद्यकीय प्राधिकरणांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र बाबत प्रथमतः दिलेला निर्णय, त्या निर्णयाचे पुनर्विलोकन व परिवर्तन करण्याचे अधिकार त्याच वैद्यकीय प्राधिकरणांना नाहीत हे या नियमात अंतर्भूत आहे. या स्वरूपाचा आक्षेप दिव्यांग कर्मचारी संघटनेने नोंदवताच स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयीन प्रशासनाने दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांचा आक्षेप गांभीर्याने विचारात घेऊन जिल्हा परिषदेंतर्गत संशयास्पद दिव्यांगत्व धारण केलेल्या कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यास कायमचा नकार देवून अशा संशयास्पद दिव्यांग कर्मचार्यांची तपासणी वैद्यकीय अपिलीय प्राधिकरणाकडुन करून घेण्यास जिल्हा परिषद प्रशासनाकडे नुकतेच आदेश दिले आहेत. ही बाब माहिती अधिकारांतर्गत आठवले यांनी उघड करून यापुढे जिल्हा परिषद प्रशासनाने संशयास्पद दिव्यांगत्व धारण केलेल्या कर्मचाऱ्यांच्या तपासणीबाबत शासकीय नियमांचे अनुपालन करुन तात्काळ अशा कर्मचाऱ्यांविरुद्ध कठोर कार्यवाही होणार असल्याची माहिती जनहितार्थ आठवले यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

## अट्टल महाविद्यालयात कवी कुसुमाग्रज जयंती साजरी

गेवराई दि.१ (प्रतिनिधी) - येथील र.भ.अट्टल महाविद्यालयात डॉ राजेश शेषम यांच्या अध्यक्षतेखाली कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्या डॉ.रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागाच्या वतीने मराठी कवींच्या कवितांवर आधारित गाणी अशा गीतांचे सादरीकरण आयोजित केले होते. जी गीते काव्य झाली अशी विविध सिनेमा आणि अल्बममधून लोकप्रिय झालेली गाणी विद्यार्थी कलावंतांनी अतिशय खुमासदार पद्धतीने सादर केली. यावेळी मराठी विभागाचे प्रा.डॉ. महारूद्र जगताप यांनी कवी कुसुमाग्रजांच्या साहित्यिक कार्यावर आणि वैचारिक जाणीवेवर प्रकाश टाकला. मराठी विभाग प्रमुख डॉ.समाधान इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सर्वांचे स्वागत केले तर प्रा.शरद सदाफुले यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले. यावेळी हिंदी विभाग प्रमुख डॉ.मारूती यमुलवाड, डॉ.सिद्धार्थ वाघमारे, प्रा.दौलत मंचरे, प्रा.सुमंत वडघणे, प्रा.उदय खरात आदी प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## शिवराय व माँ जिजाऊ यांचे विचार आत्मसात करून त्यांचे वारस व्हा -शिवाजीराजे जाधव

नवगण राजुरी दि. १ (प्रतिनिधी) - शिवजयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज, माँसाहेब जिजाऊंचे विचार आत्मसात करून त्यांच्या विचारांचे वारस व्हायला पाहिजे. असे प्रतिपादन लखोजी जाधव, राष्ट्रमाता जिजाऊंच्या घराण्यातील वंशज शिवाजीराजे जाधव यांनी केले.श्री क्षेत्र नारायणगड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते यशवंत गोसावी यांचे व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गडाचे मठाधिपती प्रेममूर्ती महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, प्रमुख उपस्थिती गडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.संभाजी महाराज हे होते व संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच लखोजीराजे जाधव राष्ट्रमाता जिजाऊचे घराण्यातील वंशज शिवाजीराजे जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा श्रीश्रेत्र संस्थान नारायणगड येथे शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पुढे बोलताना शिवाजीराजे जाधव म्हणाले की, स्त्रियांचा आदर केला पाहिजे, तरूणांनी वेसन करू नये, शिवजयंतीच्या माध्यमातून शिवरायांचे विचार साजरे केले पाहिजे. शिवरायांच्या काळात मोठमोठ्या जायजाती होत्या. मी माझ्या लेकराचा मुलाबाळाचा विचार केला असता तर त्या जायजाती वाढल्या असत्या पण स्वराज्य निर्माण झालं नसतं. शिवरायांनी त्या काळात रयतेसाठी स्वतःच्या कुटुंबाचा विचार केला नाही असे ते म्हणाले. तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा.यशवंत गोसावी यावेळी बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा विचार अवलंबावा तसेच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला आदी आयोजित स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून गडाचे विश्वस्त दिलीप गोरे, सी.ए.भानुदास जाधव, राजेंद्र मस्के, सतीश शेळके, वैजनाथ तांदळे, कुंडलिक खांडे, गंगाधर काळकुटे, नितीन धांडे, परमेश्वर तळेकर, सिद्धेश्वर सांगुळे, नारायण काशिद, विजय पवार, गणेश वरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमास पांडुरंग गवते, जीवन धांडे, गणेश लाटे, राम घुले, बापू मराडे, विकास गवते, दिलीप आहेर, चंद्रशेखर खोड, मनोज गोडसे, बापू जाधव, अमोल बागलाने, रवी शिंदे, किशोर पिसाळ, किरण भगत यांच्यासह श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड परिसरातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल बहीर यांनी केले तर सूत्रसंचालन नारायण गवते यांनी केले. शेवटी उपस्थितीचे आभार विशाल तांदळे यांनी मानले.

# संपादकीय

## आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या ; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे. शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी यंदा ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला असून, अर्थसंकल्पातील एकूण तरतुदींपैकी सुमारे ६० टक्के वाटा (४८ हजार १६४.२८ कोटी रुपये) भांडवली खर्चासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ५ हजार ५२० कोटी रुपयांची तरतूद आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेत प्रशासक म्हणून कारभार सुरू असताना मुदत ठेवी ९२ हजार कोटी रुपयांवरून ८१ हजार कोटींवर घसरल्या आहेत, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला गेला. त्यात तथ्य नाही हे अर्थसंकल्पातून दाखवून देण्यात आले. गेल्या तीन-चार वर्षांत रस्ते कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सुशोभीकरणावरही कोट्यवधींचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील खड्ड्यांचे प्रमाण कमी झाले याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे. मात्र, मुंबई शहरात बेस्ट, मेट्रो, एमएमआरडीए या स्वायत्त संस्थाच्या माध्यमातून रस्त्यावर एकाचवेळी कामे सुरू असल्याने, वाहतुकीच्या कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

# जागर महामानवांच्या विचारांचा ; संयुक्त जयंतीनिमित्त प्रेरणादायी व्याख्यान सपन्न

माजलगाव दि.१(प्रतिनिधी)-महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने रयतेचे राजा छत्रपती शिवाजी महाराज,संतश्रेष्ठ संत रविदास,संत सेवालाल महाराज, लोकशिक्षणा चे पुरस्कर्ते संत गाडगेबाबा, त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर (माता रमाई) व प्रेरणामूर्ती भीमाबाई रामजी आंबेडकर (माता भिमाई) यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त जागर महामानवांच्या विचारांचा या विषयावर व्यंकटेश हॉल या ठिकाणी व्याख्याते धर्मराज करपे यांचे सविस्तर व्याख्यान उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.यानंतर प्रास्ताविकात भरतभाऊ टाकणखार यांनी कार्यक्रमा मागील उद्दिष्ट स्पष्ट केले.या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते धर्मराज करपे यांनी रयतेचे राज्य,संतांची समता आणि मातृत्वाचा त्याग हाच आपल्या समाज परिवर्तनाचा मार्ग असून त्याचा अवलंब केल्यानंतरच मानवी जीवन सुकर बनू शकते असे प्रतिपादित केले.व्याख्यात्यांनी आपल्या ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुशासन,स्वाभिमान व लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श मांडला.संत रविदासांनी दिलेला समता,बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.संत सेवालाल महाराजांनी समाजसंघटन, नैतिकता आणि परंपरांचे जतन यासाठी केलेले कार्य विशेषत्वाने सांगितले.संत गाडगेबाबांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान आणि शिक्षण प्रसारासाठी केलेल्या अथक परिश्रमांचा उल्लेख करताना,समाजपरिवर्तनासाठी कृतीप्रधान विचारांची गरज अधोरेखित करण्यात आली.माता रमाई आणि माता भिमाई यांच्या त्याग,संघर्ष आणि संस्कारांनी घडवलेली सामाजिक चेतना ही प्रत्येक कुटुंबासाठी आदर्श असल्याचे वक्त्यांनी सांगितले.यावेळी उपस्थित बद्रीनाथ करपे,अशोक लांडगे,सखाराम जोशी,वरूनराज तौर,अमर साळवे,आनंद सिरसट, नामदेव पाचपुते,नामदेव कोकाटे,प्रभाकर साळवे, बाळासाहेब सोनसळे,अशोक राठोड,साहेबराव राठोड, प्रा.संजय बागुल,भगवान डोंगरे,विकास टाकणखार, दीपकतात्या टाकणखार,रवींद्र टाकणखार,विजयकुमार कटारे, लक्ष्मण मस्के,गोविंद गोचडे,सुदर्शन स्वामी, पांडुरंग जाधव,बन्सी डोंगरे,नितीन डोंगरे,विश्वनाथ शिंदे, शेषराव भागवत, बाळासाहेब मोरे,प्रवीण काळे,मोहन राठोड, नितीन काळे, साहेबराव चव्हाण,अमोल राऊत, बाबा लोखंडे,माणिक राठोड, लक्ष्मण सरवदे,उत्तम पवार, बबन गुहाडे,संतोष साबळे, तय्यब शेख,अबूबकर सिद्दिकी,गेनू पवार, पी.बी. शिंदे,सुरेश सोळंके,सुमंत राऊत, श्यामसुंदर दासरे,नरसिंग भांजे, प्रभाकर पांचाळ,चंद्रकांत गायकवाड, बालाप्रसाद चव्हाण, भगवान सातपुते,राजाभाऊ आबूज, अविनाश राठोड, शशिकांत घनघाव, सिद्धार्थ ढवळे,बाजीराव काळे आदी मान्यवरांनीही महापुरुषांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले.तर कार्यक्रमाची अध्यक्षता राहुल टाकणखार यांनी व आभार अभिमन्यू ईबीते मानले.शेवटी सर्व उपस्थितांनी सामाजिक समता,बंधुता,स्वाभिमान व संविधानिक मूल्यांची जोपासना करण्याचा सामूहिक संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमासाठी वसंत टाकणखार,प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,गोविंद पवार,राजकुमार सोनवणे,कृष्णा हौसरमल,नितीन पुटवाड,जीवन डोंगरे,अमोल राऊत,राहुल खुणे,अतुल चाळक,शेख जमीर आदींनी परिश्रम घेतले.

# मादळमोही येथील अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

मादळमोही दि.१(प्रतिनिधी)- प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त दिनांक २६ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून या सप्ताहाला भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. सालाबादप्रमाणे या ही वर्षी भगवंत कृपेने श्री संत सम्राट नगद नारायण महाराज यांच्या कृपेने ह भ प. प. पू. गुरुवर्य वै. महादेव महाराज ( श्री क्षेत्र संस्थान नारायण गड ) यांच्या आशीर्वादाने व ह. भ. प. प. पू. गुरुवर्य महंत शिवाजी महाराज ( श्री क्षेत्र संस्थान नारायण गड ) यांच्या शुभहस्ते श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या ३७६ व्या वैकुंठ गमना निमित्त अखंड हरिनाम सप्ताह तथा ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा ह भ प महंत श्री संभाजी महाराज( उत्तराधिकारी श्री क्षेत्र नारायण गड ) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून या अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे काकडा, विष्णुसहस्रनाम गीता पाठ, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भावार्थ रामायण, हरिपाठ, संगीत भजन, प्रवचन, रात्री हरिकीर्तन व नंतर हरी जागर असे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दिनांक ५ मार्च २० २६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री संत तुकाराम महाराज वैकुंठ गमनाचे अभंग घेऊन वैकुंठ गमन सोहळा साजरा होईल त्यानंतर ह. भ. प. परम पूज्य महंत श्री शिवाजी महाराज ( श्री क्षेत्र नारायण गड ) यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल तरी या अखंड हरिनाम सप्ताहाचा, काल्याचे कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ गावकऱ्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# इंडो-यूएस आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुकृपा फॉर्मसीच्या विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश




माजलगाव दि १(प्रतिनिधी) - वे रिसर्च सोल्यूशन, विभा आयुर्वेदा वैद्य रिसर्च सेंटर व एंजल कॉलेज ऑफ फार्मसी पुणे, यांच्या तर्फे इंडो-यूएस कॉन्फरन्स या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.औषधनिर्मिती क्षेत्रातील संशोधन प्रक्रियेत झेब्राफिश या प्राणिमॉडेलचा वाढता वापर, त्याचे फायदे आणि भविष्यकालीन संधी यांवर सखोल चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती व त्याच बरोबर पोस्टर प्रेझेंटेशन आयोजन केले गेले. या परिषदेत विविध देशांतील तज्ज्ञ संशोधक, प्राध्यापक तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते.या परिषदेदरम्यान आयोजित आंतरराष्ट्रीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव येथील एम फॉर्मसी फार्माकोलॉजी विभागाचा विद्यार्थी प्रथमेश तानाजी मिसाळ याचा द्वितीय क्रमांक आला आहे. त्याने आपली गुणवत्ता सिद्ध करत दैदिप्य मान यश मिळवले.प्रथमेशने ग्रीन केमिस्ट्री अप्रोच इन फार्मास्युटिकल रिसर्च या विषयात संशोधन सादर केले. या संशोधनासाठी त्याला गुरुकृपा फार्मसी येथील फार्मास्युटिक्सचे तज्ञ प्राध्यापक संग्राम गायकवाड यांचे गाईड व फार्मकोलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. निखिल जाधव यांचे को-गाईड म्हणून मार्गदर्शन लाभले. प्रथमेश मिसाळच्या संशोधन सादरीकरणास परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. त्यांच्या या यशामुळे गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संस्थेची शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील वाटचाल अधिक बळकट झाल्याचे मत व्यक्त केले. गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच प्राध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सिमरी पारगाव येथे शिवजन्मोत्सव उत्साहात



माजलगाव दि १ (प्रतिनिधी) -सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, सिमरी पारगाव यांच्या वतीने दिनांक २८ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

सकाळी ठीक ७ वाजता पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या थाटामाटात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या ध्वजांच्या साक्षीने निघालेल्या या पालखी सोहळ्याने संपूर्ण गाव शिवमय झाले होते. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घेतला.पालखी सोहळ्यानंतर सकाळी ९ वाजता भाग्यश्रीताई मोहिते पाटील यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत तरुणांना राष्ट्रसेवा, चारित्र्य आणि स्वाभिमानाचे महत्त्व पटवून दिले. उपस्थित नागरिकांनी व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दिवसभर गावामध्ये शिवजन्मोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला. रांगोळ्या, सजावट, भगवे झेंडे आणि घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता. सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शिवजन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या जल्लोषात पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गट अधिकारी, माजलगाव तसेच इतर मान्यवर शिक्षक उपस्थित होते.तसेच गावातील तंटामुक्ती अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनीही प्रमुख पाहुण्यांची भूमिका बजावली. मान्यवरांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे सादरीकरण आणि विविध उपक्रमांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. संपूर्ण कार्यक्रम शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.




बीड - शहरातील गुरुनानक मंदिर येथे रोटरी परिवार व सिंधी पंजाबी समाजासह विविध सामाजिक संघटनेच्या आयोजित महारक्तदान शिबिराचे उदघाटन करताना अयोध्या येथील संत साई सुरेंद्रदास तर यावेळी उपस्थित डॉ जेसवानी ,डॉ आनंत मुळे व सर्व सामाजिक संघटनांचे अध्यक्ष.

# गुरु रविदासांच्या साहित्याची व्यापक चिकित्सा झाली पाहिजे -डॉ.रफिक पारनेरकर

नांदेड दि.१ (प्रतिनिधी) : संत शिरोमणी गुरु रविदास यांचे साहित्य सर्वांना प्रेरणा देणारे आहे. या साहित्याची व्यापक चिकित्सा झाली पाहिजे असे मत संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रफिक पारनेरकर (अहिल्यानगर) यांनी व्यक्त केले.नांदेड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आठव्या अखिल भारतीय गुरु रविदास साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे गाढे अभ्यासक, जमात ए इस्लामी हिंदचे सदस्य डॉ. रफिक पारनेरकर हे बोलत होते. संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सौ. निर्मला भामोदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. लोकस्वराज्य आंदोलनाचे नेते प्रा. डॉ. रामचंद्र भरांडे (नांदेड) यांचेही यावेळी समायोचित भाषण झाले.डॉ. रफिक पारनेरकर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, प्राचीन व्यवस्थेचा मुकाबला करीत असताना गुरु रविदास यांना खूप त्रास सहन करावा लागला, तरीही खचून न जाता त्यांनी पुरोगामी विचारांची मांडणी केली. ईश्वराच्या नावाने भोळ्याभाबड्या लोकांना लुटण्यासाठी जो गोरखधंदा सुरु झाला होता, त्यास पाबंद करण्यासाठी गुरु रविदासानी निर्गुण निराकार एकेश्वरवादाची व्याख्या स्पष्ट केली. देवाच्या नावाने होणारे शोषण थांबले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.मानवतावादी विचार मांडत असताना गुरु रविदास यांनी पोथी पुराण आणि प्रत्यक्षात वेदांनाच आव्हान दिले. चारही वेदांचे त्यांनी अगदी जाहिरपणे खंडन केले. माणसामाणसात जातीय विभागणी करणाऱ्या विषमतावादी विचारांचे खंडन करुन समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची बाजू घेतली असेही शेवटी डॉ. पारनेरकर म्हणाले.

# धारूर बसस्थानकावर मातृभाषा दिन उत्साहात



किल्ले धारूर दि १(प्रतिनिधी) - धारूर येथील एस टी आगाराचे वतीने आगार प्रमुख नवनाथ चौरे यांच्या उपस्थिती मध्ये धारूर बस स्थानक येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला .जेष्ठ साहीत्यीक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पुजन करण्यात आले. उपस्थित प्रवाशांना पुष्पगुच्छ देऊन पेढे वाटप करण्यात आले या वेळी मातृभाषा दिनाचे महत्व उपस्थितांना सांगण्यात आले. त्यावेळी पत्रकार अनिल महाजन, सुर्यकांत जगताप, धनंजय कुलकर्णी,धारूर एस टी आगारातील पर्यवेक्षक व कर्मचारी उपस्थित होते मोदी, कदम, बिक्कड, श्रीमती सोनवणे, लोंढे, गायसमुद्रे, श्रीमती जावळे आदी सह प्रवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठोस आर्थिक धोरणावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल- राष्ट्रीय विचारवंत भरत अमदापुरे

माजलगाव दि.१ (प्रतिनिधी)- ठोस आर्थिक धोरणावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल असे प्रतिपादन राष्ट्रीय विचारवंत भरत अमदापुरे यांनी केले. येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात आयोजित प. पू. गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प वाटचाल विकसित भारताची या विषयावर गुंफताना भरत अमदापुरे (अभियंता क्वालकॉम इंडिया तथा राष्ट्रीय विचारवंत, पुणे ) बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, विचारांचे स्वातंत्र्य हाच लोकशाहीचा आत्म असतो. आपली लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर समाजातील सर्व व्यक्तींना वैचारिक स्वातंत्र्य देण्याची गरज आहे. आपल्या देशाची स्वातंत्र्यानंतर विकसित भारताकडे वाटचाल सुरू आहे. भारताचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी जी यांनी १९४७ मध्ये भारत महासत्ता होईल हे एक स्वप्न या देशाला दाखवले आहे. व त्या स्वप्नांच्या परिपुर्ततेसाठी ते दिवस-रात्र मेहनत करत आहेत. त्याचबरोबर आपल्या सर्व भारतीयांना त्यांच्या मेहनती मधून प्रेरणा घ्यावयास हवी. खरंतर या अगोदर आपली अर्थव्यवस्था जर पाहिली तर ती जगाच्या तुलनेमध्ये ती खूपच कमी होती. पण आज जगामध्ये चार नंबरची आपली अर्थव्यवस्था बनली आहे. चायना, जर्मनी, जपान, अमेरिका हे देश आपल्या अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये सर्वोच्च स्थानी आहेत. अध्यक्ष समारोप करताना सत्यनारायण लोहिया म्हणाले की, एक सामर्थ्यवान देश उभा करण्यासाठी नियत व नेकी लागते व ही गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेच्या माध्यमातून समाजामध्ये निर्माण करण्याचे काम हे संस्कार केंद्र करत आहे. ही गती या विश्वाला नक्कीच भारावून टाकणारी अशी आहे. परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांच्या नावाने चालणारी ही व्याख्यानमाला माजलगाव शहरवासीयना एक बौद्धिक खुराक आहे. गुरुजींच्या सानिध्यात राहण्याचे भाग्य मला लाभले तसेच द्वितीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांची निवड होताना देखील मी पाहिले आहे. मंचावर अभय कोकड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासणी, अड. विश्वास जोशी, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीमती सुनंदा खांडेकर यांनी केले तर आभार




पर्यवेक्षक सदाशिव ढगे यांनी व्यक्त मानले, वैयक्तिक पद्य कुणाल कुलकर्णी यांनी सादर केले. तर या सत्राची सांगता पसायदानाने झाली. पसायदान कु.श्रेया शेटे व कु. श्रेया ठोंगे यांनी म्हटले. यावेळी सर्व स्थानिक संस्था सभासद, माजलगाव शहरातील डॉक्टर, वकील, पत्रकार, शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी, महिला- पुरुष पालक, सेवानिवृत्त शिक्षक, तसेच माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती, सी.बी.एस.ई. च्या प्राचार्य श्रीमती वंदना मिटकरी, शिशुविहारच्या प्रमुख श्रीमती वर्षा कुलकर्णी, सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# मायग्रेन : केवळ डोकेदुखीपेक्षा अधिक

## सामान्य पण अनेकदा गैरसमज झालेला मेंदूचा आजार

डोकेदुखी ही दैनंदिन जीवनात आढळणारी एक अत्यंत सामान्य आरोग्याची तक्रार आहे. वय, लिंग किंवा सामाजिक पार्श्वभूमी काहीही असो, अनेक लोकांना कधी ना कधी डोकेदुखीचा त्रास होतो. बहुतांश वेळा ही डोकेदुखी सौम्य असते आणि थोड्याच वेळात बरी होते. मात्र डोकेदुखीचा एक प्रकार असा आहे, जो रुग्णाला खूप त्रास देतो आणि ज्याबद्दल समाजात अनेक गैरसमज आहेत, तो म्हणजे मायग्रेन.

भारतामध्ये लाखो लोक मायग्रेनने त्रस्त आहेत, तरीही हा आजार अनेकदा गंभीर मेंदूचा आजार म्हणून ओळखला जात नाही. आजही बरेच लोक मायग्रेन म्हणजे फक्त तीव्र डोकेदुखी आहे किंवा काम टाळण्याचे कारण आहे असे समजतात. प्रत्यक्षात मायग्रेन हा मेंदूशी संबंधित गुंतागुंतीचा आजार आहे. या आजारामुळे शिक्षण, नोकरी, कौटुंबिक जीवन तसेच मानसिक आरोग्यावरही मोठा परिणाम होऊ शकतो.

**मायग्रेन म्हणजे नेमके काय ?**

मायग्रेन हा मेंदूशी संबंधित एक दीर्घकाळ चालणारा आजार आहे, ज्यामध्ये वारंवार तीव्र डोकेदुखीचे झटके येतात. ही डोकेदुखी साधारण डोकेदुखीपेक्षा वेगळी असते. मायग्रेनमध्ये वेदना बहुतेक वेळा ठणठणीत किंवा धडधडणाऱ्या स्वरूपाच्या असतात आणि सहसा डोक्याच्या एका बाजूला जाणवतात, जरी कधी कधी दोन्ही बाजूंनाही वेदना होऊ शकतात. मायग्रेनच्या वेळी अनेकदा मळमळ, उलटी, तसेच प्रकाश, आवाज किंवा तीव्र वास यांची जास्त संवेदनशीलता दिसून येते. झटका सुरू झाल्यानंतर चालणे, बोलणे किंवा साधा प्रकाशसुद्धा त्रास वाढवू शकतो. त्यामुळे अनेक रुग्णांना अंधाऱ्या व शांत खोलीत विश्रांती घ्यावी लागते. मायग्रेनचे झटके काही तासांपासून ते अनेक दिवसांपर्यंत टिकू शकतात. काही लोकांमध्ये हे झटके इतके वारंवार आणि तीव्र असतात की दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होतो.

**भारतामध्ये मायग्रेन किती सामान्य आहे ?**

भारतामध्ये मायग्रेन हा आजार लोकांना वाटतो त्यापेक्षा खूप जास्त प्रमाणात आढळतो. विविध अभ्यासांनुसार, सुमारे प्रत्येक सातपैकी एक व्यक्तीला आयुष्यात कधीतरी मायग्रेनचा त्रास होऊ शकतो. हा आजार विशेषतः तरुण आणि मध्यम वयातील लोकांमध्ये अधिक दिसून येतो, म्हणजेच ज्या वयात व्यक्ती सर्वाधिक कामकाज करत असते त्या काळात.

मायग्रेन पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये अधिक आढळतो. यामागे हार्मोन्समधील बदल हे एक महत्त्वाचे कारण आहे, विशेषतः मासिक पाळी, गर्भधारणा आणि रजोनिवृत्तीच्या काळात. इतका सामान्य आजार असूनही मायग्रेनचे निदान अनेकदा होत नाही. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता कमी असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास अनेकदा तपासणी न करता वारंवार वेदनाशामक गोळ्या घेऊनच आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला जातो.

**मायग्रेन का होतो ?**

मायग्रेन का होतो याचे नेमके कारण अजून पूर्णपणे समजलेले नाही. मात्र आधुनिक वैद्यकीय संशोधनानुसार मायग्रेन हा मुख्यत्वे मेंदूशी संबंधित आजार आहे. अनेक लोकांना वाटते की मायग्रेन डोळे, सायनस किंवा रक्तदाबामुळे होतो, पण तसे नाही. मायग्रेनमध्ये मेंदूमधील वेदनांचे संदेश वाहणारे मार्ग असामान्य पद्धतीने सक्रिय होतात आणि मेंदू इंद्रियांकडून येणाऱ्या संदेशांना वेगळ्या प्रकारे प्रतिसाद देतो.

मायग्रेनचा झटका आल्यावर मेंदूमध्ये काही रासायनिक द्रव्ये स्रवतात. या द्रव्यांमुळे मेंदूतील वेदना जाणवणाऱ्या भागांमध्ये सूज येते आणि त्यांची संवेदनशीलता वाढते, त्यामुळे तीव्र डोकेदुखी आणि इतर त्रास जाणवतो. आनुवंशिक घटकांचाही यात महत्त्वाचा वाटा असतो. कुटुंबातील कोणाला मायग्रेनचा त्रास असल्यास इतर सदस्यांनाही हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. मात्र फक्त आनुवंशिक कारणे पुरेशी नसतात. ताणतणाव, झोपेतील बदल, उपवास, काही खाद्यपदार्थ किंवा जीवनशैलीशी संबंधित घटक हे मायग्रेनचे झटके सुरू होण्यास कारणीभूत ठरू शकतात.

**मायग्रेनचे सामान्य ट्रिगर (झटके सुरू होण्याची कारणे)**

मायग्रेनचा झटका कोणत्या कारणामुळे येतो हे प्रत्येक व्यक्तीनुसार वेगळे असू शकते. म्हणूनच मायग्रेनचा उपचार प्रत्येक रुग्णासाठी वेगळ्या पद्धतीने करावा लागतो. भावनिक ताणतणाव हे मायग्रेनचे सर्वात सामान्य कारण आहे, विशेषतः आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत. झोपेची वेळ विस्कळीत होणे, म्हणजेच कमी झोप घेणे किंवा फार जास्त झोप घेणे, यामुळेही मायग्रेनचा झटका येऊ शकतो.

वेळेवर जेवण न करणे, पाणी कमी पिणे आणि चहा-कॉफीचे अतिसेवन हीही मायग्रेनची सामान्य कारणे आहेत. अनेक लोकांमध्ये काही विशिष्ट खाद्यपदार्थांमुळे मायग्रेनचा त्रास वाढतो. काहींना तीव्र वास, प्रखर प्रकाश, मोठा आवाज किंवा अचानक हवामान बदल यामुळे झटका येऊ शकतो. महिलांमध्ये हार्मोन्समधील बदल हे मायग्रेनचे महत्त्वाचे कारण असते, विशेषतः मासिक पाळीच्या काळात. स्वतःचे ट्रिगर ओळखणे आणि त्याबद्दल जागरूक राहणे हे मायग्रेन नियंत्रणात ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**ऑरा असलेला मायग्रेन : मेंदू देतो आधीचा इशारा**

मायग्रेन असलेल्या अनेक लोकांना ''ऑरा'' नावाचा एक अनुभव येतो. ऑरा म्हणजे डोकेदुखी सुरू होण्यापूर्वी दिसणारी काही तात्पुरती न्यूरोलॉजिकल लक्षणे. बहुतेक वेळा ही लक्षणे डोकेदुखीच्या आधी दिसतात, पण कधी कधी ती डोकेदुखी चालू असतानाही जाणवू शकतात. ऑराची सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे डोळ्यांसमोर चमकणारे दिवे दिसणे, तिरपे किंवा झिगझॅग रेषा दिसणे किंवा दृष्टीमध्ये काही भाग काळा किंवा धूसर दिसणे. काही लोकांना चेहरा, हात किंवा पायांमध्ये मुंग्या येणे किंवा बधिरपणा जाणवू शकतो. काहींना बोलताना शब्द सापडत नाहीत किंवा नीट बोलता येत नाही अशी अडचणही जाणवू शकते. ही लक्षणे अचानक आल्यामुळे अनेकदा रुग्ण घाबरतो आणि स्ट्रोकसारखा गंभीर आजार झाला की काय अशी भीती वाटू शकते. मात्र बहुतेक वेळा मायग्रेनमधील ऑरा तात्पुरता असतो आणि धोकादायक नसतो. तरीही, कोणतीही नवीन किंवा वेगळी न्यूरोलॉजिकल लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, जेणेकरून इतर गंभीर कारणे नसल्याची खात्री करता येईल.

**मुलांमध्ये आणि किशोरवयीन मुलांमध्ये मायग्रेन**

मायग्रेन हा आजार फक्त प्रौढांपुरता मर्यादित नाही. लहान मुले आणि किशोरवयीन मुलांनाही मायग्रेनचा त्रास होऊ शकतो. मुलांमध्ये मायग्रेनची लक्षणे थोडी वेगळी असू शकतात आणि त्यामुळे अनेकदा हा आजार लक्षात येत नाही किंवा चुकीचा समज केला जातो. मायग्रेन असलेल्या मुलांना वारंवार डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो. काही मुलांना पोटदुखी, मळमळ, तसेच प्रकाश किंवा आवाजाचा त्रास जास्त जाणवतो. लहान मुले आपला त्रास नेमक्या शब्दांत सांगू शकत नसल्यामुळे मायग्रेनचा त्रास अनेकदा वागणुकीचा प्रश्न, शाळा टाळण्याचा प्रयत्न किंवा अभ्यासात रस नसल्याचे कारण समजले जाते. त्यामुळे मुलांच्या तक्रारी दुर्लक्षित होण्याची शक्यता असते. मुलांमधील मायग्रेन वेळेत ओळखणे आणि योग्य उपचार सुरू करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उपचार न झाल्यास मायग्रेनमुळे मुलांच्या अभ्यासावर, मित्रमैत्रिणींशी संबंधांवर आणि आत्मविश्वासावरही वाईट परिणाम होऊ शकतो.

**डॉक्टरांकडे कधी जावे ?**

डोकेदुखी ही जरी सामान्य समस्या असली तरी काही परिस्थितींमध्ये डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक असते. ज्यांना वारंवार डोकेदुखी होते, हळूहळू डोकेदुखी वाढत चालली आहे, दैनंदिन कामांमध्ये अडथळा येतो किंवा वारंवार वेदनाशामक गोळ्या घ्याव्या लागत आहेत, त्यांनी डॉक्टरांना नक्की दाखवावे. तसेच डोकेदुखीसोबत उलटी होणे, डोळ्यांसमोर धूसर दिसणे, शरीरात अशक्तपणा, हात-पाय सुन्न होणे किंवा शुद्धीमध्ये बदल जाणवणे अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ वैद्यकीय तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

**न्यूरोलॉजिस्टकडे कधी जावे ?**

डोकेदुखी वारंवार होत असेल, खूप तीव्र असेल, हळूहळू वाढत चालली असेल किंवा दैनंदिन कामांवर परिणाम होत असेल, तसेच नेहमीच्या औषधांनी आराम मिळत नसेल, तर न्यूरोलॉजिस्टकडे जाणे आवश्यक आहे. डोकेदुखीसोबत डोळ्यांसमोर धूसर दिसणे, शरीरात कमजोरी, हात-पाय सुन्न होणे, बोलताना अडचण येणे, गोंधळ वाटणे, वारंवार उलटी होणे किंवा डोकेदुखीचा पॅटर्न अचानक बदलणे अशी लक्षणे असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वेळेत तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास योग्य निदान होते आणि दीर्घकाळासाठी योग्य उपचार सुरू करता येतात.

**मायग्रेनचे निदान कसे केले जाते ?**

मायग्रेनचे निदान प्रामुख्याने रुग्णाने सांगितलेल्या तक्रारी आणि लक्षणांवर आधारित असते. डॉक्टर रुग्णाची सविस्तर माहिती घेतात, डोकेदुखीचा प्रकार, तीव्रता, कालावधी आणि सोबत येणारी लक्षणे यांचा बारकाईने अभ्यास करतात. मायग्रेन ओळखण्यासाठी अशी कोणतीही एक ठराविक रक्ततपासणी किंवा स्कॅन उपलब्ध नाही. मायग्रेन असलेल्या बहुतांश रुग्णांमध्ये उढ स्कॅन किंवा चठख सारख्या मेंदूच्या तपासण्या सामान्यच येतात. या तपासण्या फक्त काही निवडक रुग्णांमध्येच केल्या जातात, जिथे गंभीर कारणांची शक्यता असते. योग्य उपचार मिळावेत, अनावश्यक तपासण्या टाळाव्यात आणि रुग्णाची चिंता व खर्च कमी व्हावा यासाठी प्रशिक्षित डॉक्टर किंवा न्यूरोलॉजिस्टकडून अचूक निदान होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**उपचार : वेदनाशामक औषधांपलीकडेही आशा आहे**

आज मायग्रेनच्या उपचारांबाबत दिलासादायक बाब म्हणजे या आजारावर प्रभावी उपचार उपलब्ध आहेत. मायग्रेनचा उपचार फक्त वेदनाशामक गोळ्यांपुरता मर्यादित नाही. प्रत्येक रुग्णासाठी उपचार वेगवेगळ्या पद्धतीने ठरवले जातात आणि ते मायग्रेनचे झटके किती वेळा येतात, किती तीव्र असतात आणि दैनंदिन जीवनावर किती परिणाम करतात यावर अवलंबून असतात. झटका सुरू होताच योग्य औषधे घेतल्यास वेदना आणि इतर त्रास लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतात. ज्यांना मायग्रेनचे झटके वारंवार किंवा खूप तीव्र स्वरूपात येतात, अशा रुग्णांसाठी नियमितपणे घेण्यात येणारी प्रतिबंधक औषधे उपयोगी ठरतात. या औषधांमुळे झटक्यांची संख्या कमी होते, त्यांची तीव्रता कमी होते आणि एकूण जीवनमान सुधारते. औषधांबरोबरच जीवनशैलीत बदल करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वेळेवर झोप घेणे, वेळेवर जेवण करणे, पुरेसे पाणी पिणे, ताणतणाव नियंत्रित ठेवणे आणि नियमित व्यायाम करणे यामुळे मायग्रेनवर चांगला परिणाम होऊ शकतो.

**मायग्रेन आणि मानसिक आरोग्य**

मायग्रेन हा आजार एकट्याने होत नाही तर तो अनेकदा मानसिक आरोग्याशीही जोडलेला असतो. मायग्रेन असलेल्या अनेक रुग्णांमध्ये चिंता, काळजी किंवा नैराश्य यांसारख्या समस्या दिसून येतात. सतत होणाऱ्या वेदनांमुळे मनावर ताण येतो आणि हा मानसिक ताण पुन्हा मायग्रेन वाढवू शकतो. त्यामुळे एक दुष्ट चक्र तयार होते, जे तोडणे कठीण जाते. मायग्रेनचा योग्य उपचार करण्यासाठी फक्त डोकेदुखीवर लक्ष देणे पुरेसे नसते, तर रुग्णाच्या मानसिक आरोग्याचाही विचार करणे आवश्यक असते. रुग्णांनी आपल्या मानसिक त्रासांबद्दल डॉक्टरांशी मोकळेपणाने बोलणे आणि डॉक्टरांनीही शारीरिक तसेच मानसिक लक्षणांकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. अशा सर्वांगीण दृष्टिकोनामुळे मायग्रेनचे उपचार अधिक प्रभावी होऊ शकतात.

**मायग्रेनबाबतचे गैरसमज दूर करूया**

मायग्रेनबाबत आजही अनेक गैरसमज आहेत, ज्यामुळे रुग्णांना समाजात गैरसमजाला सामोरे जावे लागते आणि योग्य उपचार उशिरा मिळतात. मायग्रेन म्हणजे काम टाळण्याचे कारण नाही किंवा तो अशक्तपणाचे लक्षणही नाही. हा आजार पुरुष, महिला आणि मुले अशा सर्वांनाच होऊ शकतो आणि त्यामागे शरीरातील आणि मेंदूतील ठोस कारणे असतात. मायग्रेन असा आजार नाही की तो फक्त सहन करावा लागतो. आधुनिक वैद्यकीय उपचार आणि या आजाराबद्दल वाढलेली समज यामुळे आज बहुतेक मायग्रेनग्रस्त लोकांना चांगला आराम मिळू शकतो. योग्य उपचार घेतल्यास मायग्रेन असलेले लोकही सक्रिय, कार्यक्षम आणि समाधानकारक जीवन जगू शकतात.

**मायग्रेनसोबत चांगले जीवन कसे जगावे**

मायग्रेनसोबत जगण्यासाठी जागरूकता, संयम आणि रुग्ण, कुटुंबीय तसेच डॉक्टर यांच्यातील चांगला समन्वय आवश्यक असतो. वेळेत निदान होणे, योग्य उपचार घेणे आणि जीवनशैलीत आवश्यक बदल करणे यामुळे मायग्रेनग्रस्त व्यक्तीचे जीवन मोठ्या प्रमाणात सुधारू शकते. समाज म्हणून आपण मायग्रेन हा खरा आणि गंभीर मेंदूशी संबंधित आजार आहे हे मान्य केले पाहिजे. मायग्रेन असलेल्या व्यक्तींना समजून घेणे, त्यांना सहानुभूती आणि आधार देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

**रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी संदेश**


आपल्याला किंवा आपल्या जवळच्या कोणाला वारंवार डोकेदुखी होत असेल, तर ती दुर्लक्ष करू नका किंवा फक्त स्वतःहून औषधे घेऊन ती थांबवण्याचा प्रयत्न करू नका. वेळेत डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास अनेक वर्षांचा अनावश्यक त्रास टाळता येऊ शकतो. मायग्रेन हा जरी सामान्य आजार असला तरी तो अपरिहार्य आहे असे मानू नये.योग्य माहिती आणि जागरूकता हीच आराम मिळण्याची पहिली पायरी आहे.

योग्य उपचार आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास मायग्रेनवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवता येते.

**डॉ.विशाल पिंगळकर**
(न्युरो सर्जन)
विश्व हॉस्पिटल, बीड
संपर्क – ८२०८९५२४४२



# शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या दळणवळणाचा प्रश्न मिटला: सभापती पै.शरद कार्ले



**लेहनेवाडी ते जामखेड रस्त्यालगत कृषी उत्पन्न बाजार समितीची १५ एकर जागा आहे त्या ठिकाणी कांदा मार्केट उभारण्यात येणार आहे. या रस्त्यामुळे कांदा मार्केटला कांदा आणणे शेतकऱ्यांना सोपे होणार आहे. हा एक प्रकारे जामखेड शहराच्या बाहेरून मिनी बायपास होणार आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांच्या प्रयत्नामुळे या रस्त्याचे काम मार्गी लागले आहे.**

**– शरद कार्ले**
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, जामखेड

जामखेड (प्रतिनिधी) : जामखेड तालुक्यातील रा. म. मा. ५४८ ते जामखेड ते लेहनेवाडी या तीन किमी अंतराच्या रस्त्याला आता ग्रामीण रस्त्याचा दर्जा मिळाला आहे. राज्य शासनाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांच्या प्रयत्नातून हे मोठे काम मार्गी लागले आहे. या रस्त्यामुळे दळणवळण वाढणार असून शेतकऱ्यांना आपला शेतीमाल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नेने आता सोईस्कर होणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सभापती प्रा. ना राम शिंदे यांचे अभिनंदन होत आहे. लेहनेवाडी ते जामखेड हा रस्ता रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे ना हरकत पत्र देखील प्राप्त झाले होते. सभापती प्रा. ना. राम शिंदे यांनी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले. सभापती प्रा.ना. राम शिंदे यांच्या प्रयत्नामुळे रस्ते विकास योजनेत या रस्त्याचा समावेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आता हा रस्ता विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या रस्त्यापासून जवळच कृषी उत्पन्न बाजार समितीचे १५ एकर क्षेत्र आहे.या ठिकाणी कांदा मार्केट उभारण्यात येणार आहे. त्यामुळे या रस्त्याचा उपयोग शेतकऱ्यांना शेतीमाल आणि कांदा कृषी उत्पन्न बाजार समितीत आणण्यासाठी सोयीस्कर होणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या दळणवळणाचा प्रश्न मिटणार असून शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे.

# अभिनव पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



दिंद्रुड (प्रतिनिधी) : येथून जवळच दिंद्रुड-परळी हायवे लगत असलेल्या अभिनव पब्लिक स्कूल संगम मध्ये बाल विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. राजमाता मॉसाहेब जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. फिनिक्स इंटरनॅशनल स्कूल चे संस्थापक नागसेनजी कांबळे, फ्लाईंग बर्ड स्कूलचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, विजयश्री दराडे मॅडम, ॲड. विकास मिसाळ, खोलेश्वर विद्यालयाचे संस्थापक दिलीपराव पारेकर,जिजाऊ ज्ञान मंदिर उमरीचे गणेश घायतिडक, ज्ञानगंगा इंग्लिश स्कूलचे कांबळे सर,प्रा.रमेश गटकळ,सोमनाथ लटपटे,पत्रकार प्रकाश काशिद,संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे,नवनाथ कांबळे या मान्यवरांची प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थिती होती.शाळेच्या वतीने व्यासपीठावरील मान्यवरांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

संचालक गणेश गटकळ सर यांनी प्रास्ताविकात शाळेच्या प्रगती आलेखाची माहिती सांगताना इयत्ता बारावी साठी प्रस्ताव दाखल केला असून तो लवकरच मंजूर होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. अभिनव फौंडेशन बॅचेसही चालू केल्या असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच येत्या वर्षात नवीन इमारत उभा करण्याचा आमचा संकल्प असल्याचेही प्रतिपादन गटकळ सर यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार व चंद्रकांतआबा लाटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दराडे मॅडम,नागसेनजी कांबळे, चांडक यांनी मार्गदर्शन पर भाषण करत शाळेविषयी समाधान व्यक्त केले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी एक से बढकर एक अशा विविध गीतावर, रंगीबेरंगी फॅन्सी ड्रेसेसमधे छान सादरीकरण करून प्रेक्षक, माता-पालकांना मंत्रमुग्ध केले होते. आकर्षक बॅनर, डिजिटल स्क्रीन, डेकोरेशन यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या स्नेहसंमेलनात सादर केलेला धर्मरक्षक छत्रपती शंभुराजें व कवी कलश यांचा (छावा ) प्रसंग अंगावर शहारे आणणारा व हिंदू धर्म, देशभक्ती जागृत करणारा ठरला.बाळ किसन कटारे यांनी सूत्रसंचालन केले तर अभिमान पारेकर सर यांनी आभार मानले. संचालक गणेश गटकळ, गणेश लाटे, अभिमान पारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक- शिक्षिकांनी छान नियोजन व विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा,सजावट केली होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षक- शिक्षिका सह सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. बालगोपाळांचे कौतुक बघण्यासाठी महिला-पुरुषांची तोबा गर्दी झाली होती.



**न्यूज१८ लोकमतचे अँकर पत्रकार विलास बडे यांनी रविवार रोजी एका कार्यक्रमानिमित्त पाटोदा परिसरात भेट दिली असताना पाटोदा पत्रकार संघाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे सचिव ॲड.महेश बेदरे नगरसेवक श्रीहरी गीते पाटील भाजपाचे ॲड. सुधीर घुमरे.**

# द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



बीड दि.२८ (प्रतिनिधी)- येथील द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक लाहोटी एस. के., प्रमुख अतिथी विद्यालयाचे उपमुअ हावळे. ए.ए ,पर्यवेक्षक मालपाणी एन. आर. प्रमुख वक्त्या सौ. भुतडा मॅडम यांच्या शुभहस्ते छ.शिवाजी महाराज व डॉ.सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या वक्त्या सौ.भुतडा मॅडम यांनी विद्यार्थीना मार्गदर्शन करताना एखाद्या गोष्टीची प्रत्यक्ष अनुभव म्हणजे विज्ञान. आपण केलेले निरीक्षण, त्यावर केलेले प्रयोग ,प्रात्यक्षिक व त्याच्यातून मिळालेले ज्ञान म्हणजे विज्ञान. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक लाहोटी सर यांनी पदार्थांमधून होणाऱ्या प्रकाश किरणाचे विकेंद्रीकरण याविषयी माहिती. प्रकाशाचे विकेंद्रीकरण या सिद्धांतासाठी डॉक्टर सी .व्ही. रमण यांना सर्वोच्च असा नोबल पुरस्कार प्राप्त झाले असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षिका वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन इयत्ता ६ वी (ब) च्या विद्यार्थ्यांनी केले.

# शेतकऱ्यांनी पारंपारिक वर्तुळ तोडून प्रक्रिया उद्योगात उतरावे – पत्रकार विलास बडे



पाटोदा(प्रतिनिधी) :सध्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर असून कष्टाने पिकवलेल्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळत नाही, ही दुर्दैवी बाब आहे. जगातील सर्वांत कठीण व्यवसायांपैकी एक असलेल्या दुग्ध व्यवसायात शेतकरी दिवसरात्र राबत असला तरी त्याला अपेक्षित मोबदला मिळत नाही. मात्र शेतीमालावर प्रक्रिया करून बाजारात विक्री केल्यास त्याला अनेकपटीने अधिक दर मिळू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले पारंपारिक वर्तुळ तोडून उत्पादन प्रक्रियेकडे वळण्याची गरज आहे, असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व अँकर विलास बडे यांनी केले.

पाटोदा तालुक्यातील येवलवाडी फाटा येथे रविवार, १ मार्च रोजी 'भामई उद्योग समूहा'च्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामकृष्ण रंधवे महाराज होते. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, यश आजबे, बळीराम पोटे, शिवभूषण जाधव, सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, सोमीनाथ कोल्हे, अनुरथ सानप, संतोष राख, सुधीर घुमरे महेंद्र नागरगोजे एडवोकेट महेश बेदरे सुशील ढोले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना विलास बडे म्हणाले की, संतोष नागरगोजे या युवकाने स्वतःच्या गावात येऊन मोठा उद्योग उभा करणे ही निश्चितच गौरवास्पद बाब आहे. शहरात स्थायिक झाल्यानंतर अनेक जण गाव विसरतात; मात्र संतोषने गावाशी नाळ जपून उद्योग उभारण्याचे धाडस दाखवले आहे.

ते पुढे म्हणाले, शेतकरी गहू, ज्वारी यांसारखी पिके अत्यंत कष्टाने पिकवतो; परंतु त्याच धान्याचे पीठ करून, पॅकिंग करून शहरात विक्री केल्यास चारपट दर मिळतो. प्रक्रिया उद्योगामुळे शेतीमालाचे मूल्य वाढते. दुग्ध व्यवसायातही दूध उत्पादक शेतकऱ्याला प्रतिलिटर ३८ रुपये दर मिळतो; पण त्याच दुधावर प्रक्रिया करून विविध दुग्धजन्य पदार्थ तयार केल्यास मोठी बाजारपेठ उपलब्ध होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी केवळ उत्पादन न करता प्रक्रिया उद्योगात उतरून मूल्यवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

## संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त

# लोकमान्य शाळेत मुलांना वह्यांचे वाटप



जामखेड दि १ (प्रतिनिधी)- सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांचा वाढदिवसानिमित्त नवीन मराठी शाळा येथे गरजू ३०० विद्यार्थ्यांना प्रा धनजय भोसले यांच्यामार्फत वयाचे वाटप करण्यात आले त्यावेळी बोलताना कोठारी यांचे कार्याचे देशभरातून कौतुक होत आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशपांडे म्हणाले .

पुढे बोलताना बोलताना लक्ष्मी देशमुख म्हणाले आम्ही गेली ४७ वर्षा पुर्वी संजू कोठारी बरोबर शिकत होतो आमच्या शाळेतील १९७९ एस.एस.सी. बॅच एकत्र संजय कोठारी यांनी आणून चांगला कार्यक्रम घेतला त्यांच्या सारखं काम सध्या तरी कोणी करत नाही लोकांना कोरोना काळात सर्वांना मदत केली प्राण्यांना सुद्धा चारा टाकला आणि कुत्र्यांना भाकरी टाकल्या अनेकांची अंत्यविधी सुद्धा केले असे काम मी जवळून पाहिले आहे यावेळी मा. नगरसेवक दिगंबर चव्हाण म्हणाले संजय काका हे आमचे प्रेरणास्थान आहे यावेळी प्रा. धनंजय भोसले सर ,पत्रकार अविनाश बोधले मुख्याध्यापिका राळेभात मॅडम यांनी कोठारी यांच्या सामाजिक कार्याचा मन भरून कौतुक केलं.

# पार्श्वभूमी



## हम्माद हुमेर फारुकीचा पहिला रोजा पुर्ण



बीड (प्रतिनेधि):- येथील हुमेर फारोकी यांचा ८ वर्षीय मुलगा हम्माद (अरिस) हुमेर फारुकी यांनी आपल्या आयुष्याचा पहिला रोजा ठेवला. गुरुवार सायंकाळी त्याचा पहिला रोजा संपन्न झाला. सध्या उन्हाची तिव्रता जास्त असल्याने मोठमोठ्या लोकांनाही रोजाचा त्रास होतो. अशा ८ वर्षीय हम्माद रोजा ठेवल्याने नातेवाईक व मित्र परिवाराने हम्मादचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## सेवा निवृत्त शिक्षक हाजी अब्दुल जमील यांचे निधन



बीड (प्रतिनिधी): मोमीनपुरा सौदागर कॉलनी येथील रहिवासी तथा सेवानिवृत्त शिक्षक हाजी अब्दुल जमील (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने रविवारी सकाळी निधन झाले. मॅक्सिमा वॉचवाले अब्दुल मतीन , अब्दुल करीम सर यांचे ते वडिल होते. त्यांचा दफनविधी रविवारी रात्री ईशाच्या नमाज नंतर मदिना मस्जिद मैदान कब्रस्तान मोमीनपुरा येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ संपन्न

## विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव



बीड दि.१(प्रतिनिधी):- सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील व्यक्तींना प्रेरणा देऊन त्यांचा उत्साह वाढविण्याच्या उद्देशाने रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६ पुरस्कार वितरण सोहळा २०२६ येथील यशवंतराव चव्हाण नाट्य गृहात भव्य आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.

पान २ वर

## आ.सुरेश धस यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी; समर्थकांची पोलिसांत तक्रार





आष्टी (प्रतिनिधी) : आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि जीवे मारण्याची उघड धमकी देणारी पोस्ट व्हायरल झाल्याने मतदारसंघात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी आ. धस यांचे समर्थक व कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन आष्टी, अंभोरा आणि कडा येथे लेखी तक्रार दाखल करून संबंधितावर तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे.

समर्थकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी फेसबुक या सामाजिक माध्यमावर एका व्यक्तीच्या अकाउंटवरून आ. धस यांच्याविरोधात अत्यंत भडकावू व धमकीच्या स्वरूपाचा मजकूर पोस्ट करण्यात आला. संबंधित पोस्टमध्ये आ. धस यांचा उल्लेख करत उघड इशारा देण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, सदर पोस्टचा सरळ अर्थ आमदारांना जीवे मारण्याची धमकी असा होत असून, त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्रकारच्या बेजबाबदार व चिथावणीखोर वक्तव्यांमुळे समर्थकांमध्ये संतापाची भावना निर्माण होऊन

पान २ वर


## बाजीराव चव्हाण यांच्या वतीने एक लाख पाण्याच्या बाटल्या, बिस्किटे वाटप



बीड (प्रतिनिधी):-महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे , मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गुरु तेग बहादुर जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त आलेल्या सर्व भक्तगणांसाठी मुंबईच्या खारघर येथे भव्य सेवा उपक्रम राबविण्यात आला. युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या वतीने तसेच विशेष कार्य अधिकारी आरोग्यदूत

पान २ वर

## सण रंगांचा होळी.....



सण रंगांचा आहे आज होळी मान आहे त्यास नैव्यद्य पुरण पोळी जमतो एकत्र लावण्यास रंग त्यावेळी तेंव्हा वातावरण होते कसे खेळीमेळी

का आणि कसा साजरा सन होळी मनातील दुर्गुण, अविचार जाळूनी करा त्याची होळी. सन सप्तरंगाचा आहे किती सुंदर होळी.

अपेक्षांचे ओले जाळूनी करू त्याची होळी. तिरस्काराचे इंधन जाळूनी करू त्याची होळी. स्पर्धा नको कोणाशी ईर्सची आता करू होळी. दु:खास सगळ्या झटकुणी टाकू अन पेटवू त्याची होळी. आळस आता कदापी नको त्यास अग्नीत फेकुनी करू त्याची होळी. अज्ञान आणि भीतीचे मनी काहूर नको फेकुनी देवू अग्नीत त्यास आणि करू त्याची होळी.

मन:शांतीस चिंतेची जोड कशाला हवी चिंता मनीची करुनी स्वाहा पेटवू होळी.

गैरसमजास तर इथे मनी थारा नको सुसंवादातुनी फुलते नाते गैरसमजाची करू होळी. राम, लोभ, द्वेष अन लालसा हवी कशाला झटकुणी त्यांना टाकू त्यांना अग्नीत करू त्याची होळी.

अर्थ होळीचा घेऊ समजुनी कशाची करावी होळी. दु:ख, दारिद्र,भय,चिंता,मद, मत्सर होवो त्याची होळी. अज्ञान, आळस,रोग,द्वेष होवो यांचे दहन सकारात्मक तेचा स्विकार व्हावा नकारात्मकतेचे होवो दहन.

**श्रीमती.पवार मनिषा सोपानराव**

## वकिलाने केला महिलेचा विनयभंग

**माजलगाव (प्रतिनिधी)– शहरातील एका वकिलाने मोबाईलवरून फोन करून महिलेशी अश्लील व लज्जास्पद बोलत विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

येथील वकील सुधीर लिंबगावकर याने आपल्या मोबाईल नंबरवरून फिर्यादी महिलेला फोन करून वेळ आहे का तुला ? असे विचारले. त्यावर फिर्यादी महिलेने काय काम आहे बोला असे विचारले असता आरोपीने अश्लील स्वरूपाचे बोलणे सुरू केले. त्याने महिलेशी लज्जास्पद व अशोभनीय महिलेच्या भाषेत संभाषण केले. आरोपीच्या या प्रकारामुळे फिर्यादी महिलेला मानसिक त्रास झाला तसेच तिच्या सन्मानाला धक्का बसल्याची भावना निर्माण झाली. या घटनेनंतर संबंधित महिलेने शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पीडित तक्रारीवरून सुधीर लिंबगावकर या आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून शहर पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून कायद्याचे ज्ञान असलेल्या व्यक्तीकडूनच अशा प्रकारची घटना घडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## घरकुल लाभार्थ्यांची सन २०२३ ते २५ पर्यंतची यादी प्रसिध्द करा- जाधव



नांदुरघाट दि.१(प्रतिनिधी):-नांदुर घाट मध्ये घरकुल महाघोटाळा उघड होत असताना आता गावातील जनतेला सुद्धा माहिती झाले पाहिजे की घरकुल नेमके कोणाला मिळाले एका घरात तीन-तीन घरकुले कोणाला मिळाले कसे मिळाले हे सुद्धा जनतेच्या पुढील यायला पाहिजे महत्त्वाचे म्हणजे त्या घरकुलधारकाने घर बांधले आहे का तो गरजू आहे का फक्त कागदोपत्री घरकुलाचा लाभ घेतला आहे असे सुद्धा जनतेच्या निदर्शनास आले पाहिजे त्यामुळे नांदूर घाट ग्रामपंचायत ने मोठे डिजिटल बॅनर लावून ग्रामपंचायत समोर व सार्वजनिक ठिकाणी मारुती मंदिरासमोर २०२३ २४ २५ या कार्यकाळातील ज्यांना घरकुल मंजूर झाले आहेत व त्यांना किती हप्ते पडले आहेत किती रक्कम आली आहे हे ग्रामपंचायत समोर लावावे असे आव्हान ग्रामसेवक व सरपंच यांना ग्रामपंचायत सदस्य सौ सोनाली अमोल जाधव यांनी केले आहे.

पान २ वर

## आझाद हिंद सेमी इंग्लिश, उर्दू शाळेत सायन्स डे



बीड (प्रतिनिधी):-विज्ञान दिनाचे औचित्य साधून दि.२८ फेब्रुवारी रोजी आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू शाळेत सायन्स डे -विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. मुलांनी एकूण ८० प्रोजेक्टचे सादरीकरण केले होते. प्रदर्शनाचे उदघाटन जिल्हा रुग्णालयातील डॉ. मुजाहेद, बीड शहरातील नामांकित डॉ.विशाल हजारी, एमआयएम जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफिक यांच्या

पान २ वर

## बिबट्यापासून सुरक्षेसाठी शेतकऱ्यांना कॅमेरे व अलार्म यंत्रणा उपलब्ध करण्याची गरज-आ.धस



पाटोदा दि.१(महेश बेदरे):- राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पाटोदा-आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतकऱ्यांवर निर्माण झालेल्या धोक्याचा मुद्दा ठळकपणे उपस्थित केला. विशेषतः वस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

आ.धस म्हणाले की, पूर्वी बिबट्यांचा वावर जंगलापुरता मर्यादित होता; मात्र आता उसासारख्या दाट पिकांमध्ये त्यांचे वास्तव्य वाढले आहे. त्यामुळे पाटोदा-आष्टी भागात बिबट्यांची संख्या वाढून शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी वस्ती परिसरात बिबट्यांचा वावर वाढत असल्याने जीवित आणि पशुधन धोक्यात आले आहे. गोरगरीब शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने कॅमेरे किंवा सुरक्षा साधने बसवणे शक्य नाही. त्यामुळे वनविभागाने वस्ती भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी ठोस मागणी

**अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडली वस्तुस्थिती**

**१५०–२०० मीटर परिसरात पूर्वसूचना देणारी प्रणाली बसवण्याची मागणी**

पान २ वर

## आ.धस यांच्याविरोधात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याला जशास तसे उत्तर देऊन धडा शिकवू–डॉ.नरेंद्र जावळे



पाटोदा -आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या बद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह व धमकीची पोस्ट टाकणाऱ्या व्यक्तीला जशास तसे उत्तर दिले जाईल आणि कायदेशीर मार्गाने धडा शिकवला जाईल, असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ज्येष्ठ नेते डॉक्टर नरेंद्र जावळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.डॉ. जावळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, परळी येथील गोविंद फड नामक व्यक्तीने आ.सुरेश धस यांच्यासारख्या सक्षम लोकप्रतिनिधीं विरोधात सोशल मीडियाच्या माध्यमातून पातळी सोडून टीका करणे व धमकीवजा मजकूर प्रसारित करणे ही गंभीर बाब आहे. अशा प्रकारांमुळे सामाजिक वातावरण दूषित होते आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित व्यक्तीवर तातडीने कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.तसेच, आ.सुरेश धस हे मतदारसंघातील विकासकामे आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत. त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. अशा प्रवृत्तीला कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने ठोस उत्तर दिले जाईल, असेही डॉ. नरेंद्र जावळे यांनी स्पष्ट केले आहे

## शेख मोहम्मद याचा पहिला रोजा पूर्ण



बीड दि.१ (प्रतिनिधी) :- पवित्र रमजान महिन्या च्या पार्श्वभूमी वर बीड चे शिक्षक मास्टर सिद्दिक अहमद, नगरसेवक शेख बिलाल यांचे पुतणे शेख मोहम्मद याने आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला. अतिशय

पान २ वर

## मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या समितीवर संभाजी सुर्वे



बीड (प्रतिनिधी) :-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांची उन्नती पाहिजे असेल तर त्यांच्या बांदा पर्यंत रस्ता झाला पाहिजे असे उराशी स्वप्न बाळगणाऱ्या महाराष्ट्राच्या लोकनेत्यानी शेतकऱ्यांच्या हिताची योजना चालू केली आहे. ती योजना म्हणजे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता. आणि या योजनेच्या समितीवर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शिफारशीवरून बीड जिल्ह्यात सर्वात पहिला सदस्य म्हणून शेतकऱ्यांची जाण असलेला ऊसतोड कामगाराचा मुलगा संभाजी सुर्वे यांची निवड केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, भारतीय जनता पार्टीचे सरकार हे कायम शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत आले आहे. त्या मध्ये शेतकऱ्यांचा अतिशय महत्वाचा विषय म्हणजे शेतीत जाणारा रस्ता. हा रस्ता काही कारणास्तव होत नाही म्हणून तो रस्ता झालाच पाहिजे असे या योजनेचा एकमेव हेतू आहे. या योजनेमुळे शेतकरी बांधवात अतिशय सकारात्मक विचार आहेत. त्या मध्ये ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या आडी अडचणीला भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे हे कायम सामोरे जात आले आहेत. आणि योग योग असा की आज त्यांचीच निवड या महत्वपूर्ण समितीवर निवड करण्यात आली आहे.या निवडीमुळे सामान्य शेतकऱ्यांत एक आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरावरून संभाजी सुर्वे यांना शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. यावेळी बोलताना संभाजी सुर्वे यांनी मुख्यमंत्री,महसूल मंत्री तसेच उप जिल्हाधिकारी व उप विभागीय अधिकारी बीड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे महिनाभर मधुमेह रुग्णांची रक्त व लघवी मोफत तपासणी

बीड दि.१(प्रतिनिधी):-राष्ट्रसंतांच्या पुण्यस्मृति दिनानिमित्त आनंद ऋषीजी हॉस्पिटल येथे मार्च महिनाभर मोफत मधुमेह (साखर) तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी जपत 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर सेवा देणाऱ्या या रुग्णालयात बीड शहर व परिसरातील नागरिकांसाठी हा विशेष आरोग्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वेळेवर तपासणी न केल्यास हृदयविकार, मूत्रपिंड विकार, डोळ्यांचे आजार यांसारख्या गंभीर गुंतागुंती उद्भवू शकतात. त्यामुळे जनजागृती व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा या उद्देशाने हे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या अभियानांतर्गत पुढील तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत : रक्तातील जेवणाअगोदरची साखर, जेवणानंतरची साखर,रँडम शुगर तपासणी.तपासणीसोबत मोफत वैद्यकीय मार्गदर्शनही दिले जाणार असून बीडमधील सुप्रसिद्ध डॉ. राजेश पारिख रुग्णांना योग्य आहार, व्यायाम व जीवनशैलीविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तपासणीची वेळ : दररोज सकाळी ७ ते संध्याकाळी ७ स्थळ : आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला, बीड या स्तुत्य उपक्रमाचा लाभ बीड शहर व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन सकल जैन समाज, बीड व जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल विद्यार्थ्यांचे विजयकांत मुंडे यांच्याकडून कौतुक

केज दि १ (प्रतिनिधी)- वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सर्व कृषी तंत्र विद्यालयाच्या संयुक्त विद्यामानाने दोन दिवसीय बीड जिल्हा स्तरीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन बीड येथील कृषी तंत्र विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते.या स्पर्धेत देवगाव येथिल कृषी तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदवत यश मिळवले आहे.

या स्पर्धेचा शुभारंभ माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या हस्ते तर डॉ.भगवान आसेकर सं.शिक्षण तथा अधिष्ठाता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ.राजेंद्र लोंढे (सहयोगी अधिष्ठता शिक्षण वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी), डॉ.मधूकर खळगे (प्राचार्य घटक कृषी तंत्र विद्यालय आंबेजोगाई) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.दरम्यान कृषी तंत्र विद्यालय बीड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये कबड्डी,व्हॉलीबॉल,खो-खो,१०० मीटर,२०० मीटर,४०० मिटर धावणे,गोळा फेक व लांब उडी अशा खेळांचा समावेश होता.सदरील खेळामध्ये देवगाव येथिल कृषी तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

## शेख मोईजचा पहिला रोजा पूर्ण



माजलगाव (प्रतिनिधी):- पवित्र रमजान महिन्याच्या पावन वातावरणात शहरातील मोगल मोहल्ला येथील रहिवासी मोईज रहीम शेख या अवघ्या दहा वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण करत कौतुकास्पद उदाहरण घालून दिले. लहान वयातही मोईज ने अत्यंत श्रद्धा, संयम आणि उत्साहाने दिवसभर उपवास पाळला. सायंकाळी इफ्तारच्या वेळी कुटुंबीयांनी त्याचे अभिनंदन करत आनंद व्यक्त केला. मोईजच्या या पहिल्या रोज्यामुळे कुटुंबात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातूनही त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पुण्य कर्म करणारा माणूस देव माणूस होतो–ह.भ.प.रंधवे महाराज



बीड दि. २८ (प्रतिनिधी):-प्रत्येकाने पीडित आणि रंजल्या, गांजल्यांची सेवा करावी. सेवेने माणूस मोठा होतो. सेवा केल्यास स्वामी होतो. सेवा करणाराच देव माणूस होतो. सेवाधर्म हा तुम्हाला दैवत्वाकडे घेऊन जातो, असे प्रतिपादन पाटोदा येथील विठ्ठल गड संस्थानचे मठाधिपती तथा गिनिज बुक ऑफ रेकॉर्ड प्राप्त कीर्तनकार ह भ प रामकृष्ण रंधवे महाराज यांनी केले.

बीड येथील संत भगवान बाबा प्रतिष्ठान'वर भगवानबाबा सप्ताह समितीच्या वतीने आयोजित आयोजित सर्व धर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहात 'तुज मागणे हे देवा । आम्हा तुझी चरण सेवा ।।आन नेघो तरी । रिद्धी सिद्धी मुक्ती चारी' ।।

पान २ वर

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उद्यम)

सूचना

**भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल)** याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील निर्देशित स्थळासाठी एलपीजी वितरकांच्या निवडीसाठी री-ड्रॉ (पुनः सोडत),ठिकाण: **डी.पी.डी.सी हॉल**,जिल्हाधिकारी कार्यालय,रेल्वे स्टेशन रोड, बी.एस.एन.एल कार्यालय समोर,वजिराबाद, जिल्हा -नांदेड - ४३१६०१ येथे होणार आहे.

(खाली दर्शविलेले तारीख व वेळ यानुसार)

या पुनःसोडतीसाठी लायक / पात्र / अर्हता प्राप्त अर्जदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी निर्देशित तारीख, वेळ आणि ठिकाण यानुसार सरकारद्वारा दिल्या गेलेल्या ओळखपत्रासहित उपस्थित राहण्याची कृपा करावी.

| अ.क्र | स्थळ | ड्रॉ (सोडत) तारीख | ड्रॉ (सोडत) वेळ |
|---|---|---|---|
| १ | विडा, बीड | ०५.०३.२०२६ | स. ११:३० वा. |

Bharat Petroleum Corporation Limited

(A Government of India Enterprise)

NOTICE

**Bharat Petroleum Corporation Ltd. (BPCL)** hereby Inform that the Re-Draw for LPG Distributor for Location (As per List Below) will be held on (as per Dates indicated) at the venue **DPDC Hall, Office of District Collector, Railway Station Road, Opposite BSNL Bhavan, Vazirabad, Nanded – 431 601** at (Times and Date as stated below)

Applicants who have qualified for the Re-Draw are requested to be present in person with a photo identity card issued by any Government Department, at the specified date, time and venue.

| Sr.No. | Location | Date of Re-Draw | Time of Re-Draw |
|---|---|---|---|
| 1 | Wida, Beed | 05.03.2026 | 11.30 am |

CMYK